# अडखळणे
## त्यांचा स्वीकार करू नका



आशीष रायचूर

## विनामूल्य वाटपासाठी

ऑल पीपल्स चर्च एंड वर्ल्ड आउटरीच, बैंगलोर, भारतद्वारे निर्मित आणि वितरित।
वर्तमान आवृत्ती: 2024

## संपर्क सूचना

All Peoples Church & World Outreach,
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: **bookrequest@apcwo.org**
Website: **apcwo.org**

अन्यथा सूचित केले नसल्यास, पवित्र शास्त्रातील सर्व संदर्भ द बायबल सोसायटी ऑफ इंडिया (BSI) द्वारे प्रकाशित पवित्र बायबल, बीएसआय - मराठी - ओ.व्ही मधून उद्‌त करण्यात आले आहेत. परवानगीने. सर्व हक्क राखीव.

## आर्थिक भागिदारी

या पुस्तकाचे विनामूल्य वितरण ऑल पीपल्स चर्चचे सदस्य, सहभागी आणि मित्रांच्या आर्थिक मदतीमुळे शक्य झाले आहे. जर आपण या विनामूल्य प्रकाशनाद्वारे आशीर्वाद प्राप्त केला असेल, तर आम्ही आपणास ऑल पीपल्स चर्चच्या विनामूल्य प्रकाशनांच्या मुद्रणासाठी तसेच वितरणासाठी आर्थिक अंशदान देण्यासाठी आमंत्रित करतो. कृपया **apcwo.org/give** वर जावे अथवा आपले दान कसे द्यावे हे पाहण्यासाठी या पुस्तकाच्या मागे "ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी" हे पृष्ठ पाहावे. धन्यवाद!

## मुफ़्त संसाधन आणि संबंधित माहिती

**संदेश:** apcwo.org/sermons | **पुस्तके:** apcwo.org/books | **चर्च ॲप:** apcwo.org/app
**बायबल कॉलेज:** apcbiblecollege.org | **ई-लर्निंग:** apcbiblecollege.org/elearn
**सल्ला:** chrysalislife.org | **संगीत:** apcmusic.org
**मिनिस्टर्स फेलोशिप:** pamfi.org | **एपीसी वर्ल्ड मिषन:** apcworldmissions.org

(Marathi — Offenses—Don't Take Them)

# अडखळणे
## त्यांचा स्वीकार करू नका

# अनुक्रमणिका


परिचय

1. सापळा किंवा अडखळण 1

2. अडखळणे येतील 4

3. निवड तुमच्या हाती आहे 20

4. अडखळणांनी प्रेरित होऊन कार्य करू नका 28

5. प्रेम आम्हास मुक्त करते 35

# परिचय

जीवनात, आम्हा सर्वांना अडखळल्याचे दुःख अनुभवास येते. सर्व प्रकारच्या गोष्टी मन दुखवू शकतात, अडखळणे आणू शकतात. आमचे मन दुखावते. कोणीतरी असे काही बोलले की ज्यामुळे आम्हाला वाईट वाटते. आम्हास संधी, मान्यता, किंवा बढती मिळाली नाही ज्यास आम्ही लायक होतो की आम्ही अडखळतो, दुखावतो. आम्ही दुखावलो की त्याचा परिणाम आमच्या आंतरिक जीवनात घडू लागतो आणि शेवटी अनेकप्रकारे आम्हास प्रभावित करतो ज्याची आम्ही कल्पनाही केली नसावी. ज्याचा उपाय करण्यात आला नाही अशा अडखळणातून कार्य करणारा असमंजस आणि अविवेकी पद्धतीने कार्य करतो. जेव्हा हे मंडळीच्या जीवनात होते, देवाच्या लोकांत होते, तेव्हा आम्ही काही दुःखदायक गोष्टी घडतांना पाहतो—निंदा करणे, चहाड्या करणे, लोक एक चर्च सोडून दुसऱ्या चर्चमध्ये जातात, मंडळीत फूट पडते, ख्रिस्ती पुढारी एकमेकांपासून दूर होऊ लागतात, आणि सर्वात जास्त म्हणजे, मंडळी जे ख्रिस्ताचे शरीर, ते कमकुवत होते. तथापि, जर आपणास हे समजून आले की अडखळणावर कसा विजय मिळवावा, तर या गोष्टी टाळता येतात आणि स्थानिक मंडळी तसेच ख्रिस्ताची मंडळी तितकी मजबूत होऊ शकते.

जीवनातील या सामान्य घटनेविषयी बायबल काय म्हणते? जेव्हा आमचे मन दुखावले जाते तेव्हा आपण कशी प्रतिक्रिया दिली पाहिजे? आम्ही दुखावल्यावर आमच्या मनात येणाऱ्या नकारात्मक भावनांपासून आम्ही कसे मुक्त होऊ शकतो? आम्हाला आशा आहे की, या सोप्या लहानशा अभ्यासात, आम्हाला या प्रश्नांची

उत्तरे मिळतील आणि आम्ही पूर्णपणे अडखळणांपासून मुक्त असे जीवन जगण्यास शिकू.

नेहमी अडखळणाच्या भावनेच्या वर जगावे.

देव तुम्हास आशीर्वादित करो
आशीष रायचूर

# 1
# सापळा किंवा अडखळण

इतरांनी म्हटलेल्या अथवा केलेल्या गोष्टी ऐकून किंवा पाहून जेव्हा आम्ही अडखळतो, तेव्हा आम्हाला अपमान झाल्यासारखे आणि दुखावल्यासारखे वाटते. दुखावल्यानंतर वेगवेगळ्या लोकांच्या वेगवेगळ्या प्रतिक्रिया असतात. काही लोक संतप्त होतात आणि सूड घेतात. काही लोक इतरांपासून दुरावतात, एकांतात जातात, इतरांशी संबंध तोडतात. काही लोक इतर मार्गांनी, इतरांची बदनामी करून, इतरांस कमी लेखून, त्यांच्याविषयी विद्वेष पसरवून सूड घेतात. आपण सर्वांनी या गोष्टीचा अनुभव घेतला आहे आणि यापैकी एक किंवा अनेक पद्धतींनी प्रतिक्रिया व्यक्त केली आहे. आम्हास वाटते की आम्हाला असे करण्याचा हक्क आहे कारण आम्ही दुखावलो आहोत. आम्हास वाटते की आपण एक किंवा दुसऱ्या पद्धतीने सूड घेतल्याने आम्हास बरे वाटेल आणि आम्ही अनुभवलेले दुःख कमी होईल.

तथापि, अडखळणाच्या विषयावर आपण बायबलच्या दृष्टिकोनातून पाहण्याचा प्रयत्न करू या. तेव्हा कदाचित आपण गोष्टी वेगळ्या पद्धतीने पाहू शकू.

**मत्तय 16:23**
**परंतु तो वळून पेत्राला म्हणाला, "अरे सैताना, माझ्यापुढून निघून जा; तू मला अडखळण आहेस; कारण देवाच्या गोष्टींकडे तुझे लक्ष नाही, माणसांच्या गोष्टींकडे आहे."**

ग्रीक भाषेत "अडखळण" हा शब्द आहे *'स्कंदलॉन.'* ते दोन गोष्टींचा संदर्भ देते,

1) **सापळा:** हा सापळ्याचा (आमिषाचा) संदर्भ देते, जो सापळ्याचा चाप आहे. तुम्ही सापळ्याच्या चापाला स्पर्श करता (किंवा आमिष पकडता) आणि सापळा तुमच्यावर खाली येतो. तुम्ही अडकता (फसता).

2) **अडखळण:** अडखळण घालणारा अडथळा. तो अशा खडकाचा उल्लेख आहे जो एखाद्या व्यक्तीला अडखळण बनून पाडतो. तर, अडखळण ही अशी गोष्ट आहे ज्याचा उद्देश एखाद्या व्यक्तीला अडखळण घालण्यास आणि त्यांना पडण्यास कारणीभूत करते.

अडखळणाचा अंतिम परिणाम एखाद्यास पापात पाडणे.

मत्तय 16 मधील घटनेत असे वाटते की, पेत्र प्रभु येशू ख्रिस्तासाठी फार कळकळीने व प्रामाणिकपणे बोलत होता. तथापि, येशूने काहीतरी वेगळे पाहिले. येशूने पाहिले की ज्या देवाच्या गोष्टींचा पाठपुरावा तो करत होता त्यात अडखळण आणणारा, अडथळ्याचे उगमस्थान, सापळा रचणारा सैतान आहे.

अडखळण हा सैतानाचा सापळा (आमिष) आणि सैतानाचा पाश आहे. आपण देवाच्या उद्देशात पुढे जाऊ नये म्हणून आपल्याला अडकवण्याचा किंवा फसवण्याचा हा सैतानाचा प्रयत्न आहे.

पुढच्या वेळी जेव्हा अडखळल्यासारखे वाटत असेल, ते कोणामुळे किंवा कशामुळे झाल्याची पर्वा न करता, आत्मिकरित्या याचा अर्थ काय आहे याचा विचार करा. ही व्यक्तीची गोष्ट नाही. किंवा परिस्थितीची बाब नाही. तुम्ही ज्या व्यक्तीमुळे किंवा परिस्थितीमुळे दुखावले जाता त्यापेक्षा अधिक गंभीर अशा काही गोष्टी असू शकतात. अडखळण हा एक सापळा आणि फास आहे. जर तुम्ही त्यात पडाल तर सैतानाला तुम्हाला फसवण्याची किंवा देवाच्या उद्देशांमध्ये तुमच्या प्रवासात अडथळे आणण्याची संधी मिळेल.

तुम्ही आपल्या जीवनात सैतानाला संधी देऊ इच्छिता का? निश्चितच नाही! अडखळणाचे कारण किंवा उगम काहीही असो, नाराज झाल्यावर तुमच्या मनातून अडखळण दूर ठेवणे हा एक प्रतिसाद असावा. तुमच्या हृदयात अडखळणास जागा नसावी.

## मनन

1) अलीकडे जेव्हा तुम्ही अडखळला होता किंवा तुम्हाला दुखावण्याची संधी मिळाली होती, त्याविषयी मनन करा.

- कोणत्या कारणामुळे तुम्ही अडखळला?
- तुम्हाला कसे वाटले? तुम्ही अडखळला हे तुम्हाला कसे माहीत झाले?
- तुम्ही काय केले? जेव्हा तुम्ही अडखळला किंवा दुखावला तेव्हा ती परिस्थिती तुम्ही कशी हाताळली?
- मागे वळून पाहता, जेव्हा तुम्ही अडखळला तेव्हा ज्या पद्धतीने तुम्ही त्या गोष्टी हाताळल्या त्याबाबत आनंदी आहात का? येशूचे गौरव झाले का? तुम्ही गोष्टी वेगळ्या पद्धतीने हाताळू शकला असता का?
- ज्या व्यक्तीने (जर कोणी असल्यास) तुम्हाला दुखावले त्याच्या-सोबत पुन्हा नाते स्थापन करण्याच्या गरजेविषयी आपणास काही करण्याची आवश्यकता आहे का?

# 2
# अडखळणे येतील

या प्रकरणात, आपण अडखळणांच्या तीन वेगवेगळ्या स्रोतांचा विचार करणार आहोत ज्यांस आम्हाला सामान्यतः तोंड द्यावे लागते. हे अर्थातच एकमेव स्रोत नाहीत, परंतु कदाचित सर्वात सामान्य आहेत.

1) जगापासून येणारी अडखळणे,
2) नकळत येणारी अडखळणे,
3) अधिकाऱ्यांकडून येणारी अडखळणे.

विश्वासणाऱ्यांना त्यांच्या आध्यात्मिक जीवनात अडखळणांचा सामना का करावा लागतो या तीन कारणांवरही आम्ही चर्चा करणार आहोत. हे विश्वासणाऱ्यांसाठी विशिष्ट आहे.

1) परमेश्वरासोबत अडखळणे
2) येशू ख्रिस्तामुळे अडखळणे
3) वचन आणि आत्म्यामुळे अडखळणे

असलेल्या तीन अडखळणांचे स्रोत पाहू या:

## जगापासून येणारी अडखळणे

**मत्तय 18:6,7**

**6 "माझ्यावर विश्वास ठेवणाऱ्या ह्या लहानांतील एकाला जो कोणी अडखळवील त्याच्या गळ्यात मोठ्या जात्याची तळी बांधून त्याला समुद्राच्या खोल पाण्यात बुडवावे ह्यात त्याचे हित आहे.**
**7 अडखळणांमुळे जगाची केवढी दुर्दशा होणार! अडखळणे तर अवश्य होणार;**

**परंतु ज्या माणसाकडून अडखळण होईल त्याची केवढी दुर्दशा होणार!"**

अडखळणांसाठी दिलेला ग्रीक शब्द आहे *'स्कंदलॉन,'* मागील प्रकरणात आपण याचा अभ्यास केला आहे. मत्तय 18 मधील या वचनांच्या संदर्भात अडखळणांचा हेतू त्याच्या "लहानांपैकी" (निष्पाप, नम्र लोक), एकास अर्थात विश्वासणाऱ्यांस पापात पाडणे हा आहे.

वचन 7 मध्ये तीन गोष्टींची रूपरेखा मांडलेली आहे:

1) जग अडखळणांनी भरलेले आहे
2) अडखळणे येतील
3) ही अडखळणे लोकांद्वारे येतील

जग अडखळणांनी भरलेले आहे. येशूने म्हटले, *"अडखळणांमुळे जगाची केवढी दुर्दशा होणार!"* (मत्तय 18:7) जे येशूवर विश्वास ठेवतात त्यांच्यासाठी हे जग सापळे व अडखळणे यांनी भरलेले आहे, जे त्यांनी पाप करावे, चूक करावी याची आणि त्यांना विश्वासापासून दूर नेण्याची वाट पाहत आहे. किंबहुना, जसजसा काळ शेवटाकडे जातो, आम्ही मत्तय 24:10 मध्ये येशूने दिलेल्या चेतावणीकडे लक्ष द्यावे: *"त्या वेळी 'पुष्कळ जण अडखळतील', एकमेकांना धरून देतील, व एकमेकांचा द्वेष करतील."* जग असेच होणार आहे.

अडखळणे येतील. विश्वासणारे म्हणून, आपली अडखळणांपासून सुटका नाही.जग अडखळणांनी भरलेले आहे, आणि आपण या जगात राहत आहोत. जग तुमच्या विरोधात त्याची अडखळणे, सापळे आणि पाश फेकेल. आणि दुःखाची गोष्ट ही आहे की, कधी कधी इतर विश्वासणाऱ्यांद्वारे देखील अडखळणे येतात. त्यासाठी तयार असा.

अडखळणे लोकांद्वारे येतात. येशूने म्हटले, *"अडखळणे तर अवश्य होणार; परंतु ज्या माणसाकडून अडखळण होईल त्याची केवढी*

*दुर्दशा होणार!"* (मत्तय 18:7), तो आम्हास सांगत होता की लोकच ही अडखळणे आणतात. अडखळणे येण्याचे कारण आपल्या जवळपासचे लोक अशा गोष्टी बोलू शकतात आणि करू शकतात ज्यामुळे तुम्हाला त्रास होऊ शकतो.

येशूने आधीच घोषणा केली आहे की ज्या व्यक्तीद्वारे अडखळण येते त्याचे काय होते. त्या व्यक्तीवर दुःख, संकट, आणि सर्वनाश ओढवतो. जर कोणी तुम्ही प्रभूविरूद्ध पाप करावे म्हणून आपल्या दिशेने अडखळण आणि सापळा तयार करीत असेल, तर बाजूला व्हा आणि परमेश्वरास ते हाताळू द्या. तुम्हाला त्यांच्याविरुद्ध काहीही करण्याची गरज नाही.

## नकळत येणारी अडखळणे

**उपदेशक 7:21,22**
**21 बोललेल्या सर्व शब्दांकडे लक्ष देऊ नकोस, देशील तर कदाचित तुझा चाकर तुला शिव्याशाप देताना ऐकशील;**
**22 कारण तूही इतरांना वारंवार शिव्याशाप दिलेस हे तुझ्या मनास ठाऊक आहे.**

कधी कधी आम्ही अशा लोकांद्वारे अडखळतो ज्यांचा हेतू आम्हास दुखविणे नसतो. ते काही गोष्टी गंमतीने, किंवा नकळत बोलून जातात किंवा करतात, आणि तरीही ते जे काही म्हणतात किंवा करतात त्याद्वारे आम्ही अडखळतो, आम्हास दुःख होते. अशा गोष्टी आम्ही मनाला न लावून घेण्यास शिकले पाहिजे. दुसऱ्या शब्दांत, या गोष्टी गांभीर्याने घेऊ नका. त्या सोडून द्याव्या. त्यातून मोठा वाद निर्माण करू नका. आपल्यावर जी कृपा केली जावी असे आपणास वाटते, ती कृपा आपणही इतरांवर करावी. आमच्यापैकी सर्वांनीच फारसा विचार न करता काही गोष्टी केल्या आहेत किंवा बोललो आहोत आणि नंतर आम्हाला कळून आले की जरी आमचा तसा हेतू नव्हता, तरी त्यामुळे कोणीतरी दुखावले, अडखळले.

## अधिकार पदांवर असलेल्यांद्वारे अडखळण

**1 पेत्र 2:18-21**

**[18] घरच्या चाकरांनो, तुम्ही पूर्ण भयाने आपल्या धन्यांच्या अधीन असा; जे चांगले व सौम्य त्यांच्याच केवळ नव्हे, तर जे कठोर त्यांच्याही अधीन असा.**
**[19] जर कोणी अन्याय सोसताना देवाचे स्मरण ठेवून दुःखे सहन करतो तर ते उचित आहे.**
**[20] कारण पाप केल्याबद्दल मिळालेले ठोसे तुम्ही निमूटपणे सहन केल्यास त्यात काय मोठेपणा? पण चांगले केल्याबद्दल दुःख भोगणे व ते निमूटपणे सहन करणे हे देवाच्या दृष्टीने उचित आहे.**
**[21] कारण ह्याचकरता तुम्हांला पाचारण करण्यात आले आहे; कारण ख्रिस्तानेही तुमच्यासाठी दुःख भोगले आणि तेणेकरून तुम्ही त्याच्या पावलांवर पाऊल ठेवून चालावे म्हणून त्याने तुमच्याकरता कित्ता घालून दिला आहे.**

1 पेत्र 2 च्या, 13 व्या वचनापासून, पेत्र अधिकाऱ्यांच्या अधीन राहण्याबाबत विश्वासणाऱ्यांस निर्देश देत आहे. आज, नवीन कराराच्या काळासारखी  परिस्थिती नसली, तरी सत्य तेच आहे. कर्मचारी म्हणून आम्ही कार्यस्थळी आपल्या अधिकाऱ्यांच्या अधीन राहतो. नागरिक या नात्याने, आम्ही नागरी अधिकाऱ्यांच्या अधीन राहतो. कुटूंबाचे सदस्य म्हणून आम्ही कुटूंबात त्या लोकांच्या अधीन राहतो जे आमच्यावर अधिकार ठेवतात.

आमच्यावर अधिकार ठेवणारे जर कठोर असतील, आम्ही चांगले काम करीत असतांनाही आमच्याशी अन्यायाने वागत असतील आणि आम्हाला त्रास देत असतील, तर आम्ही काय करावे? आजच्या संदर्भात हे अधिकारी असू शकतात जे आक्षेप घेणारे असतील, असे अधिकारी जे पक्षपात करतात, जे आमच्या कार्यक्षमतेकडे कानाडोळा करतात, जे जाणूनबुजून आमची वेतनवाढ थांबवितात इत्यादी. आम्ही काय केले पाहिजे? पेत्राने असे म्हणून याचे उत्तर दिले आहे:

- अधीन रहा
- दुःख सहन करा
- धीराने घ्या

केवळ परमेश्वर असे करण्यासाठी आम्हास कृपा पुरवू शकतो. पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याने, ख्रिस्ताने केले तसे आम्ही हे करू शकतो. आम्ही त्यांच्या दृष्टिकोनातून परिस्थितीकडे पाहण्याचा प्रयत्न करतो. आम्ही वरिष्ठ अधिकाऱ्यांप्रमाणे परिस्थिती पाहण्याचा प्रयत्न करतो, जिथे आम्ही अनेकदा चुकतो. अधिकाऱ्यांवर कोणता दबाव आहे हे आम्ही समजून घेण्याचा प्रयत्न करतो.

जर सतत अन्याय असेल आणि आमच्या हितास धोका असेल, तर आम्ही स्वतःस तेथून दूर करून सुरक्षेच्या ठिकाणी जावे. आमच्या आधुनिक दिवसाचा संदर्भ आम्हास संधी देतो की आम्ही स्वतःस तेथून काढून सुरक्षेच्या ठिकाणी जावे, नोकरी बदलावी, इत्यादी, जे करणे नवीन कराराच्या काळात शक्य नव्हते, जेथे चाकरांस तसे करण्याची संधी नव्हती. शिवाय, बहुतेक परिस्थितीमध्ये, आम्ही आमचे दृष्टीकोन व्यक्त करू शकतो आणि अधिकाऱ्यांशी झालेल्या गोष्टींबद्दल चर्चा करू शकतो व कायदेशीर आणि नैतिकदृष्ट्या स्वीकार्य मार्गांनी मुद्दे मांडू शकतो.

या सर्व गोष्टींत सर्वात महत्वाची बाब ही आहे की आम्ही अधिकाऱ्यांविषयी स्वतःची अंतःकरणे अडखळणांपासून मुक्त ठेवावी. अडखळणे येतील. आम्ही अधिकाऱ्यांद्वारे दुखविले जाऊ. पण नवीन करार आम्हाला त्यांच्याविषयी मनात कटुत्व बाळगण्याची परवानगी देत नाही.

उदाहरणार्थ, जर एखाद्या आत्मिक पुढाऱ्याद्वारे, आपल्या स्थानिक मंडळीच्या पाळकाद्वारे आपले मन दुखविले गेले तर काय? कदाचित

त्यांनी असा निर्णय घेतला जो तुम्हाला समजला नाही. कदाचित, आपण एखाद्या पदावर सेवा करण्याची उत्सुकतेने वाट पाहत असतांना, त्यांनी सेवेच्या त्या क्षेत्रात दुसऱ्या कोणाला निवडले. कदाचित आपण विश्वासूपणे अनेक वर्षे केलेल्या सेवेकडे त्यांनी दुर्लक्ष केले आणि अशा व्यक्तीला सन्मान दिला ज्याने आपल्यासारखी कुठलीही सेवा केली नाही. मंडळीच्या जीवनात अशा अनेक प्रकारच्या घटना घडू शकतात, ज्यामुळे आपण अडखळू शकतो, दुखावू शकतो. तुम्ही काय केले पाहिजे? पेत्राने पुढाऱ्यांविषयी लिहिलेली गोष्ट येथेही लागू होते. अधीन रहा. दुःख सहन करा. धीर धरा. शक्य तेथे, स्वीकारणीय आणि सन्माननीय पद्धतीने आपली चिंता किंवा दृष्टीकोन व्यक्त करा. आणि जर तेथे दुर्व्यवहार, धोका झाला असेल, आणि तुमच्या हितसंबंधांना हानि घडत असेल, तर सुरक्षेच्या ठिकाणी जा. तुम्ही जे काही करता, तेथे कोणत्याही व्यक्तीविरूद्ध मनात कटुत्व किंवा अडखळण ठेवू नका.

आता, आपण तीन कारणांवर चर्चा करू या की विश्वासणाऱ्यांस त्यांच्या आत्मिक जीवनांत अडखळणांस तोंड का द्यावे लागते:

## परमेश्वरासोबत अडखळणे

**उत्पत्ति 4:3-7**

**3 काही काळ लोटल्यावर असे झाले की काइनाने परमेश्वराला शेताच्या उत्पन्नापैकी काही अर्पण आणले.**

**4 हाबेलानेही आपल्या कळपातील प्रथम जन्मलेल्यांतून म्हणजे त्यांच्यातल्या पुष्ट मेंढरांतून काही अर्पण आणले. परमेश्वराने हाबेल व त्याचे अर्पण ह्यांचा आदर केला;**

**5 पण काइन व त्याचे अर्पण ह्यांचा त्याने आदर केला नाही; म्हणून काइन संतापला व त्याचे तोंड उतरले.**

**6 तेव्हा परमेश्वर काइनाला म्हणाला, “तू का संतापलास? आणि तुझे तोंड का उतरले?**

**7 तू बरे केलेस तर तुझी मुद्रा प्रसन्न होणार नाही काय? पण तू बरे केले नाहीस**

**तर दाराशी पाप टपूनच आहे; त्याचा रोख तुझ्यावर आहे. ह्याकरता तू त्याला दाबात ठेव."**

काईन रागावला होता आणि त्याचा चेहरा दुःखी होता. तो उदास होता. त्याच्या कपाळावर आठ्या पडल्या होत्या. तो परमेश्वरावर नाराज झाला. काईनच्या नजरेत देव अयोग्य, पक्षपाती आणि अन्यायी वाटत होता. पण देव न्यायी होता. काईनाला हाबेलासारखीच संधी मिळाली होती, की त्याने परमेश्वरासमोर योग्य असे वागावे, आणि परमेश्वरास मान्य असे अर्पण वाहावे. पण काईनास वाटत होते की परमेश्वराने त्याच्या अटीनुसार कार्य करावे. हा अहंकार होता.

काईन देवावर रागावला होता आणि तरीही तो देवाने सांगितलेल्या मार्गाने जाऊ इच्छित नव्हता. या अडखळण आणि गर्विष्ठतेच्या ठिकाणी पाप काईनावर वर्चस्व मिळविण्याची वाट पाहत होते. परंतु काईनाने जे योग्य ते करून पापावर प्रभुत्व मिळवावे अशी देवाची इच्छा होती.

कधीकधी, विश्वासणारे देवावर रागावतात. सर्व प्रकारच्या जीवनातील परिस्थितींमुळे त्यांना असे वाटू शकते की देव त्यांच्या बाबतीत अन्यायकारक व अन्यायशील आहे. त्यांना वाटते की ते चांगल्या गोष्टींस पात्र आहेत. दुसऱ्या एखाद्याला आशीर्वाद का मिळाला किंवा त्यांच्यापेक्षा इतर कोणाला काहीतरी चांगले का मिळाले हे त्यांना समजू शकत नाही. देवाने त्यांच्या अटींवर कार्य करावे अशी त्यांची इच्छा असते. हा आत्मिक गर्व आहे. गर्व किंवा अहंकार आहे ज्याने आपण देवाला नाराज करतो. अशा अवस्थेत धोका हा आहे, जिथे एखादी व्यक्ती देवावर नाराज असते, जेथे पाप त्यावर वर्चस्व मिळविण्याची वाट पाहत असते. हे अडखळण पापासाठी प्रवेशद्वार बनते आणि त्याद्वारे सैतानास आत येण्याची मुभा मिळते आणि विश्वासणाऱ्याच्या जीवनात असुरक्षित क्षेत्रावर त्याला नियंत्रण लाभते.

याचा तोड म्हणजे पश्चात्ताप करणे. परमेश्वराजवळ येऊन हे कबूल

करणे की तो नेहमीच चांगला, न्याय्य आणि योग्य आहे. तो कोण आहे याविषयी आपणच गैरसमज केला आहे. आम्ही अभिमान बाळगला आणि आपल्या पद्धतीने सर्वकाही घडले पाहिजे असे आम्हास वाटले.

## *जेव्हा संदेष्टा निराश झाला*

**मत्तय 11:2-6**

**2 योहान बंदिशाळेत असताना त्याने ख्रिस्ताच्या कृत्यांविषयी ऐकून आपल्या शिष्यांना पाठवून त्याला विचारले,**
**3 "जे येणार आहेत ते आपणच, की आम्ही दुसऱ्याची वाट पाहावी?"**
**4 येशूने त्यांना उत्तर दिले, "जे तुम्ही ऐकता व पाहता ते योहानाला जाऊन सांगा;**
**5 'आंधळे पाहतात,' पांगळे चालतात, कुष्ठरोगी शुद्ध होतात, बहिरे ऐकतात, मेलेले उठवले जातात व 'गरिबांना सुवार्ता सांगण्यात येते.'**
**6 जो कोणी माझ्यासंबंधाने अडखळत** (ग्रीक *'स्कँडलिझो'*) **नाही तो धन्य होय."**

या परिस्थितीची कल्पना करण्याचा प्रयत्न करा. बाप्तिस्मा करणारा योहान तो व्यक्ती होता ज्याने दैवी प्रकाशनाद्वारे येशूला ओळखले, जगाला त्याची ओळख करून दिली. योहान तो होता ज्याने त्याला *"जगाचे पाप हरण करणारा देवाचा कोकरा असल्याचे घोषित केले!"* (योहान 1:29). हाच एक योहान होता ज्याने येशूला पवित्र आत्म्यात बाप्तिस्मा देणारा म्हणून घोषित केले. पण आता योहानाला तुरूंगात टाकण्यात आले आहे, येशूची सेवा सुरू आहे, परंतु योहानाला तुरूंगातून बाहेर काढण्यासाठी तो काहीही करीत नाही. योहानाच्या मनात काय सुरू आहे याची कल्पना करा—"जर येशू खरोखरच मशीहा असेल तर तो निःसंशयपणे मला तुरूंगातून सोडवील. पण हा माणूस काही करत नाही. तो खरोखर मशीहा आहे काय?" आणि म्हणून योहान आपल्या शिष्यांना हे जाणून घेण्यासाठी पाठवतो. येशू योहानाला त्याच्यामुळे अडखळू नये म्हणून प्रोत्साहन देऊन त्याची प्रतिक्रिया संपवतो. योहानाच्या शब्दात याचा अर्थ येशू मूलतः म्हणत होता, "योहाना, मला माहित आहे की तुरुंगात असल्यामुळे तुला उदास वाटत आहे. तू निराश आहेस. परंतु अडखळण मनात येऊ देऊ नको."

जेव्हा आम्हाला असे वाटते की परमेश्वराने आम्हाला “निराश” केले आहे, तेव्हा हे जाणून घ्या की तो कोणालाही कधीच निराश करीत नाही. आणि सर्वात अधिक म्हणजे त्याच्याप्रत आपल्या अंतःकरणात अडखळण येऊ देऊ नका. प्रत्येक परिस्थितीत काय करावे हे त्याला माहित आहे.

## येशू ख्रिस्तामुळे अडखळणे: अडखळण्याचा खडक

यशयाने येशू ख्रिस्ताविषयी भविष्यवाणी केली आणि तो त्याला अडखळण्याचा खडक आणि ठेच लागण्याचा धोंडा म्हणून संबोधित करतो:

**यशया 8:13-15**
**13 तर सेनाधीश परमेश्वरालाच पवित्र माना; त्याचेच भय व धाक धरा.**
**14 म्हणजे तो तुम्हांला पवित्रस्थान होईल; तथापि इस्राएलाच्या उभय घराण्यांत तो ठेच लागण्याचा धोंडा व अडखळण्याचा खडक आणि यरुशलेमेच्या रहिवाशांना पाश व सापळा असा होईल.**
**15 त्यांपैकी बहुत लोक ठेचा खातील, पडतील व आपटून छिन्नभिन्न होतील, पाशांत अडकून धरले जातील.”**

**यशया 28:16**
**ह्यास्तव प्रभू परमेश्वर म्हणतो, “पाहा, सीयोनेत पायाचा दगड बसवणारा मी आहे; मी पारखलेला दगड आहे; ती पायाला योग्य अशी मजबूत व मोलवान कोनशिला आहे; ‘विश्वास ठेवणाऱ्याची त्रेधा उडणार नाही.’”**

मजेदार गोष्ट म्हणजे, रोमकरांस लिहिलेल्या पत्रामध्ये प्रेषित पौल आणि 1 पेत्रामध्ये प्रेषित पेत्र येशू ख्रिस्तासंबंधाने यशयाच्या भविष्यवाणीचा संदर्भ घेतात.

येशू आल्यावर यहूदी लोकांनी येशूला नाकारले कारण तो मशीहाबद्दलच्या त्यांच्या अपेक्षा पूर्ण करत नव्हता. प्रेषित पौल रोमकरांस पत्र 9:30-33 मध्ये यशयाच्या भविष्यवाणीच्या पूर्णतेबद्दल लिहितो. इस्राएली लोक येशू ख्रिस्ताला अडखळले कारण ते विश्वासाने

नीतिमत्व प्राप्त करू शकत नव्हते. त्याऐवजी त्यांनी नियमशास्त्राद्वारे आपले नीतिमत्व स्थापित करण्याचा प्रयत्न केला.

प्रेषित पेत्राने जे लिहिले ते येथे आहे :

**1 पेत्र 2:6-8**
**6 कारण असा शास्त्रलेख आहे: "पाहा, निवडलेली, मूल्यवान अशी कोनशिला मी सीयोनेत बसवतो; तिच्यावर विश्वास ठेवणारा फजीत होणार नाही."**
**7 म्हणून तुम्हा विश्वास ठेवणाऱ्यांना तो मूल्यवान आहे; परंतु जे विश्वास ठेवत नाहीत त्यांना, "बांधणाऱ्यांनी नापसंत केलेला धोंडा तोच कोनशिला झाला,"**
**8 आणि "ठेच लागण्याचा धोंडा व अडखळण्याचा खडक असा झाला;" ते वचन मानत नसल्यामुळे ठेचाळतात, त्यासाठी ते नेमलेही होते.**

विश्वासणाऱ्यांसाठी, येशू ख्रिस्त हा मुख्य कोनशिला आहे आणि तो मौल्यवान आहे. तरीही तो काहींना अडखळण्याचा खडक आणि ठेच लागण्याचा धोंडा आहे.

येशू ख्रिस्त हा काही जणांना अडखळण आहे आणि ते मंडळींवर, त्याच्या लोकांवर सूड घेतात. येशू ख्रिस्तावरील तुमच्या विश्वासामुळे लोकांनी जर तुम्हाला अडखळले तर आश्चर्यचकित होऊ नका. तुमच्याठायी असलेल्या ख्रिस्तामुळे लोक अडखळले आहेत. प्रेषित पौलाने असे म्हटले आहे: *"तारणप्राप्ती होत असलेले आणि नाश होत असलेले अशा लोकांसंबंधाने आम्ही देवाला संतोषदायक असा ख्रिस्ताचा परिमल आहोत; एकाला मृत्यूचा मरणसूचक गंध, आणि एकाला जीवनाचा जीवनसूचक गंध आहोत. हे कार्य करण्यास कोण लायक आहे?"* (2 करिंथ 2:15,16).

येशूने मत्तय 26:31,33 मध्ये अशी भविष्यवाणी केली की त्याच्या वधस्तंभारोहणाच्या वेळी त्याचे शिष्य अडखळतील: *"तेव्हा येशू त्यांना म्हणाला, "तुम्ही सर्व ह्याच रात्री माझ्याविषयी अडखळाल* (ग्रीक *'स्कॅन्डेलिझो'); कारण असा शास्त्रलेख आहे की, 'मी मेंढपाळाला मारीन आणि कळपातल्या मेंढरांची दाणादाण होईल.' पेत्राने त्याला उत्तर दिले,*

*"आपणाविषयी सर्व अडखळले (ग्रीक 'स्कॅन्डेलिझो') तरी मी कधीही अडखळणार नाही."* जरी पेत्राने धैर्य दाखविण्याचा प्रयत्न केला, तरीही तो अडखळला.

येशूने अनेक ठिकाणी आपल्या शिष्यांस येणाऱ्या अडखळणांविषयी आधीच सांगितले. योहान 16:1,2 चा विचार करा : *"तुम्ही अडखळवले (ग्रीक 'स्कॅन्डेलिझो') जाऊ नये म्हणून मी तुम्हांला ह्या गोष्टी सांगून ठेवल्या आहेत. ते तुम्हांला सभाबहिष्कृत करतील, इतकेच काय पण तुमचा जीव घेणाऱ्या प्रत्येकाला आपण देवाला सेवा सादर करत आहोत असे वाटेल, अशी वेळ येत आहे."*

अशाप्रकारे विश्वासणाऱ्यांस येशू ख्रिस्तामधील त्यांच्या विश्वासामुळे अडखळणास तोंड द्यावे लागेल.

## वचन आणि आत्म्यामुळे अडखळलेले

येथे यशयामधून दुसरी भविष्यवाणी दिलेली आहे :

**यशया 28:9-13**
**9 "तो कोणाला ज्ञान शिकवतो? कोणाला संदेश समजावून सांगतो? दूध तुटलेल्यांना काय? थानतुट्या बालकांना काय?**
**10 कारण नियमावर नियम, नियमावर नियम; कानूवर कानू, कानूवर कानू; थोडे येथे, थोडे तेथे; असे तो बोलत असतो."**
**11 तोतऱ्यांच्या द्वारे परभाषेत तो ह्या लोकांशी बोलेल;**
**12 तो त्यांना म्हणाला होता, "ही विश्रांती आहे, भागलेल्यास विसावा द्या; त्याने त्याला आराम होईल," तरी ते ऐकतना.**
**13 ह्यामुळे त्यांना परमेश्वराचा संदेश अशा प्रकारे प्राप्त होईल: नियमावर नियम, नियमावर नियम; कानूवर कानू, कानूवर कानू; थोडे येथे, थोडे तेथे; म्हणजे चालताना ते अडखळून मागे पडतील, भंगतील, पाशात सापडतील, पकडले जातील.**

कधी कधी लोक वचनाद्वारे, परमेश्वराच्या सत्याद्वारे अडखळतात.

वचनाचा हेतू आमची वाढ करणे, आम्हास ज्ञान आणि समज देणे हा आहे. यशया 28:11,12 आत्म्याच्या कार्याचा आणि अन्य भाषेत बोलण्याचा उल्लेख करते, जसे 1 करिंथ 14:21 मध्ये प्रेषित पौलाने संदर्भ घेतला आहे. तरीही लोक याचा देखील नाकार करतात. ते अडखळतात, पडतात, त्यांना ठेच लागते, आणि ते पाशात पडतात कारण ते वचनाचा किंवा आत्म्याचा स्वीकार करण्यास असमर्थ असतात.

विश्वासणाऱ्यांच्या जीवनात हे खालील प्रकारे दिसून येते :

## *जेव्हा परमेश्वर आपली समज वाढवितो*

कधीकधी आपण विश्वासणारे म्हणून वचन आणि आत्म्याद्वारे अडखळता कारण ते आपल्या संदर्भित चौकटीत बसत नाही. अंतःकरणातील भाव उघड करण्यासाठी म्हणून परमेश्वर आपल्या मनापुढे अडखळण आणतो. म्हणून, जेव्हा तुम्हाला असे वाटते की तुम्ही ईश्वरीय ज्ञानात प्राविण्य मिळविले आणि तुम्ही पवित्र आत्म्याच्या प्रवाहात परिपूर्ण आहात, तेव्हा कोणीतरी असा  पुढे येतो ज्याच्याद्वारे वचन आणि आत्मा कधी आपण कल्पनाही केली नसलेल्या मार्गांनी व्यक्त होतो. हे अक्षरशः तुमची समजूत हालवून ठेवते. आपल्याला निवड करावयाची आहे. आपण एकतर याद्वारे अडखळू शकता आणि ते पूर्णपणे नाकारू शकता किंवा आपण आपली आत्मिक समज, क्षमता आणि अनुभव वाढविण्यासाठी आणि त्याचा विस्तार करण्यासाठी परमेश्वरास विनंती करू शकता. [**टीप:** आम्ही पाखंडी शिकवणीचा संदर्भ घेत नाही. जे पाखंडी मत किंवा त्रुटी आहे त्यास तसे म्हटले पाहिजे. आम्ही अशा काही गोष्टीचा उल्लेख करीत आहोत  जी परमेश्वराची आहे, फक्त त्याचा नाही ज्याची तुम्हाला सवय आहे.]

चुकीची गोष्ट म्हणजे आपण समजत नसलेल्या एखाद्या गोष्टीशी लढणे. ख्रिस्ती जगतात आपण किती वेळा विश्वासऱ्यांस  एकमेकांवर दोषारोप करताना पाहतो कारण ते शब्द आणि आत्म्याच्या कामात

दुसऱ्या कोणाकडून तरी अडखळतात. ते शब्द आणि आत्म्याचे प्रकाशन प्राप्त करण्यास अयोग्य आहेत व त्यामुळे ते नाराज होतात आणि नंतर त्यांना समजत नसलेली गोष्ट ते नष्ट करतात.

## *जेव्हा इतरांना आपल्यातील देवाच्या कार्याविषयी गैरसमज होतो*

वचन आणि आत्म्यामुळे एखाद्या विश्वासणाऱ्यास अडखळण होते तो दुसरा मार्ग म्हणजे जेव्हा परमेश्वर आपल्या जीवनात काय करीत आहे हे ज्यांना समजत नाही, ते तुमच्या विरोधात उठतात. कधीकधी लोक आपल्यावर हल्ला करतात, चिडवतात, उपहास करतात, टीका करतात आणि तुम्हाला नावे ठेवतात, कारण परमेश्वर त्याच्या वचनाद्वारे आणि त्याच्या आत्म्याद्वारे तुमच्याद्वारे ते कार्य करतो ते समजण्यास ते असमर्थ असतात.

येशूने आपणासाठी पेरणाऱ्याच्या दृष्टांतात खडकाळ जमिनीवरील बीजाचा उल्लेख केला. त्यात येशूने वचनामुळे येणाऱ्या छळाविषयी सांगितले ज्यामुळे एखादा अडखळला जातो.

**मत्तय 13:21**
**परंतु त्याला मूळ नसल्याकारणाने तो थोडाच वेळ टिकतो, आणि वचनामुळे संकट आले किंवा छळ झाला म्हणजे तो लगेच अडखळतो** (ग्रीक *'स्कॅन्डेलिझो'*).

प्रेषित पौलाने त्याच्या दिवसात, सुंतेविषयी प्रचार करण्याऐवजी, येशू ख्रिस्ताच्या वधस्तंभाचा प्रचार केल्यामुळे अडखळणास तोंड दिले :

**गलतीकरांस पत्र 5:11**
**बंधुजनहो, मी अजून सुंतेचा उपदेश करत असलो तर अद्याप माझा छळ का होत आहे? तसे असते तर वधस्तंभाचे अडखळण** (ग्रीक *'स्कँडेलॉन'*) **नाहीसे झाले आहे.**

## *जेव्हा वचन आणि आत्म्याच्या कार्याला नापसंती असते*

**गलतीकरांस पत्र 1:9,10**
**9आम्ही अगोदर सांगितले तसे मी आताही पुन्हा सांगतो की, जी तुम्ही स्वीकारली तिच्याहून निराळी सुवार्ता कोणी तुम्हांला सांगितल्यास तो शापभ्रष्ट असो.**
**10 मी आता मनुष्याची की देवाची मनधरणी करायला पाहत आहे? मी मनुष्यांना संतुष्ट करायला पाहत आहे काय? मी अजूनपर्यंत मनुष्यांना संतुष्ट करत राहिलो असतो तर मी ख्रिस्ताचा दास नसतो.**

रोमकरांस पत्र 1 मध्ये लोकप्रिय मताचा मार्ग कोणता आहे याचे वर्णन केल्यासारखे दिसते.

लोक

- *"अनीतिने सत्य दाबून ठेवतात"* (रोमकरांस पत्र 1:18).
- *"आपल्या कल्पनांनी शून्यवत झाले"* (रोमकरांस पत्र 1:21).
- *"त्यांचे निर्बुद्ध मन अंधकाराने भरून गेले"* (रोमकरांस पत्र 1:21).
- *"स्वतःला शहाणे म्हणता म्हणता ते मूर्ख बनले"* (रोमकरांस पत्र 1:22).
- *"देवाच्या खरेपणाची लबाडीशी अदलाबदल केली"* (रोमकरांस पत्र 1:25).
- *"देवाची जाणीव ठेवण्यास ते मान्य झाले नाही"* (रोमकरांस पत्र1:28).
- *"अनुचित कर्म करणारे विपरीत मन"* (रोमकरांस पत्र 1:28).
- या *"रीतिने वागतात ते मरणास पात्र आहे"* (रोमकरांस पत्र 1:32).
- *"मरणास पात्र अशी"* कार्ये करणाऱ्यास ते मान्य करतात (रोमकरांस पत्र 1:32).

आज जेव्हा आपण विवाह, लैंगिकता, कुटुंब, पती-पत्नीची भूमिका, पालकांचा सन्मान, नागरी अधिकाराचा सन्मान करणे, देवाने नेमलेल्या

पुढाऱ्याच्या अधीन राहणे इत्यादी गोष्टींबद्दल परमेश्वर जे बोलला आहे त्यास पसंती देऊन उभे राहतो, तेव्हा जग आपली चेष्टा करते. ते यास असहिष्णु, धर्मांध, आणि तिरस्कृत असे म्हणतात. विश्वासणाऱ्याने काय करावे? मंडळीने  कसा प्रतिसाद द्यावा? ख्रिस्ती पुढाऱ्यांनी कसा प्रतिसाद द्यावा? मंडळीकडे एकच पर्याय आहे. पौलाने शिकविल्याप्रमाणे: *"सत्याचा स्तंभ व पाया अशी जी जिवंत देवाची मंडळी"* (1 तीमथ्य 3:15). मंडळीला समाजात सत्याचे समर्थन आणि रक्षण करणारा असे म्हणतात. अडखळण टाळण्यासाठी आणि लोकांना प्रसन्न करण्यासाठी आम्ही देवाच्या सत्याशी तडजोड करू शकत नाही. सत्याशी तडजोड न करता आपण प्रेमात सत्य बोलले पाहिजे. आम्ही लोक जसे आहेत तसेच त्यांच्यावर प्रेम करतो, परंतु परिवर्तनाचे सामर्थ्य असलेले देवाचे सत्य देखील सादर करतो. काहीजणांना देवाच्या वचनाचे सत्य आणि त्याच्या आत्म्याचे कार्य आक्षेपार्ह वाटू शकते आणि ते सूड घेतात. आमच्याजवळ देवाच्या वचनाची बाजू घेण्याशिवाय कोणताही पर्याय नाही आणि आपली भूमिका बजावली पाहिजे.

## आणखी अनेक संधी

अडखळणे येतील. विश्वासणारे म्हणून दुखावण्याच्या अनेक संधी आमच्याजवळ असतील. आम्ही या प्रकरणात काहींची रूपरेखा मांडली आहे. खरा मुद्दा हा आहे की अडखळणे आल्यावर आम्ही त्यांना कसे तोंड देतो. **लक्षात ठेवा अडखळण्याची प्रत्येक संधी शत्रूच्या सापळ्यात पडण्याची आणि ठेच खाण्याची संधी आहे.** आम्ही निर्धार केला पाहिजे की कोणत्याही स्थितीत, कोणत्याही परिस्थितीत आम्ही आमच्या जीवनांत अडखळणांस जागा देणार नाही.

# मनन

1) या प्रकरणात चर्चा करण्यात आलेल्या कोणत्याही अडखळणास आपण तोंड दिले आहे का? मनन करा. खाली यादीबद्ध करण्यात आलेल्या वेगवेगळ्या परिस्थितील गोष्टींना आपण कसे तोंड दिले?

   - जगापासून अडखळणे
   - नकळत येणारी अडखळणे
   - अधिकाऱ्यांकडून येणारी अडखळणे.
   - परमेश्वरासोबत अडखळणे,
   - येशू ख्रिस्तामुळे अडखळणे,
   - वचन आणि आत्म्यामुळे अडखळणे.

# 3
# निवड तुमच्या हाती आहे

## अडखळण्याच्या भावनेच्या वर जगा

**नीतिसूत्रे 4:23**
**सर्व रक्षणीय वस्तूंपेक्षा आपल्या अंत:करणाचे विशेष रक्षण कर, कारण त्यात जीवनाचा उगम आहे.**

**मत्तय 12:35**
**चांगला माणूस आपल्या अंतःकरणाच्या चांगल्या भांडारातून चांगल्या गोष्टी काढतो आणि वाईट माणूस आपल्या वाईट भांडारातून वाईट गोष्टी काढतो.**

आम्ही आपल्या अंतःकरणाचे, आपल्या आंतरिक मनुष्याचे रक्षण केले पाहिजे, कारण आमच्या अंतःकरणातून अशा शक्ती उद्भवतात ज्या आमच्या जीवनास आकार देतात.

आमच्या अंतःकरणात जे आहे ते आमच्या जीवनांतून बाहेर पडते.

आमच्या जीवनात जे घडत आहे त्यात जर आम्हास बदल घडवून आणावयाचा असेल, तर आमच्या अंतःकरणात साठवलेल्या गोष्टी बदलल्या पाहिजेत.

जसे आम्ही पाहिले आहे, अडखळण अडकण्याची किंवा ठेच लागण्याची संधी आहे. हे आपल्याला पाप आणि चुकीच्या मार्गात भरकटायला लावते. सर्व प्रकारच्या परिस्थितींत सर्व प्रकारच्या लोकांद्वारे अडखळणे येतील. तथापि, अडखळणाचा स्वीकार करावा किंवा नाही हे आमच्या हाती आहे. जेव्हा आमच्या मार्गात अडखळणे

येतात तेव्हा आपण न अडखळण्याची किंवा अडखळण्याची निवड करू शकतो.

ज्या क्षणी तुम्हाला अडखळणास तोंड द्यावे लागते त्या क्षणी तुम्ही ही निवड करू शकता—कोणीतरी असे काहीतरी म्हटले किंवा केले ज्यामुळे आपले मन दुखावले, अपमान झाला, किंवा तुम्हाला राग आला. तुम्ही पूर्ण परिश्रमपूर्वक तुमच्या अंतःकरणाचे रक्षण करण्याची आणि अडखळणास त्यात राहू न देण्याची निवड करू शकता. तुमच्या अंतःकरणात या अडखळणाची साठवणूक करण्यास तुम्ही नकार देऊ शकता. तुम्हास माहित आहे की वाईट गोष्टींच्या साठवणूकीमुळे आपल्या जीवनात आपण वाईट गोष्टींना मोकळीक देतो.

जेव्हा आपणापुढे अडखळण ठेवले जाते तेव्हा आपण त्याच्या वर जगण्याची निवड करू शकता. त्या अडखळणाच्या वर जगणे निवडा. ते प्राप्त करण्यासाठी खाली वाकू नका. प्रेमाच्या उच्च पातळीवर जगा (नंतरच्या प्रकरणात यावर चर्चा केली जाईल).

प्रेषित पौलाने काय म्हटले यावर विचार करा :

**प्रेषितांची कृत्ये 24:16**
**ह्यामुळे देवासंबंधाने व माणसांसंबंधाने माझे मन सतत शुद्ध राखण्याचा मी यत्न करत असतो.**

परमेश्वर व मनुष्याप्रत आपला विवेक दोषमुक्त, शुद्ध ठेवण्यासाठी पौलाने परिश्रमपूर्वक प्रयत्न केले.

ग्रीक *'आस्कियो'* मधील "प्रयत्न" या शब्दाचा अर्थ "प्रशिक्षण, व्यायाम, ताण, वेदना आणि श्रम घेणे" असा होतो.

पौल येथे ग्रीक भाषेत वापरत असलेला "अडखळण" हा शब्द *'अप्रोस्कोपोस'* आहे, जो *'स्कॅन्डेलॉन'* पेक्षा वेगळा आहे, जो आपण आधी

पाहिला आहे. *'ॲप्रोस्कोपोस'* चे तीन अर्थ आहेत :

1) अडखळण्यास कारणीभूत नसणे, म्हणजे इतरांना पापात जाण्यास प्रवृत्त न करणे.
2) न अडखळणे, अर्थात पापात न पडणे, निर्दोष असणे.
3) पापाची जाणीव नसणे, पापविरहित हृदय.

म्हणून, आपला विवेक पापाच्या आणि अपराधाच्या जाणीवेपासून मुक्त ठेवण्याचा पौल सर्वप्रकारे प्रयत्न करीत होता. त्याने कोणत्याही स्वरूपातील पाप—पाप करण्यास, इतरांना पाप करण्यास प्रवृत्त करण्यास, किंवा पापाच्या जाणीवेखाली जगण्यास—त्याच्या आंतरिक व्यक्तीमध्ये प्रवेश करण्यास परवानगी दिली नाही. त्याने आपले अंतःकरण (आणि त्याद्वारे विवेकबुद्धी) स्वच्छ आणि शुद्ध ठेवण्याची निवड केली.

आपण अडखळणांच्यावर जगणे निवडू शकतो आणि आपले अंतःकरण देव आणि मनुष्यांप्रती शुद्ध व स्वच्छ ठेवू शकतो. हे सोपे असणार नाही. आम्हाला स्वतःस प्रशिक्षित करावे लागेल, अभ्यास करावा लागेल, आणि असे करण्यासाठी परिश्रम करावे लागेल. पण ते मौल्यवान आहे. अशाप्रकारे आपण अडखळणांच्या वर जगतो.

आपण जेव्हा अडखळणांना तोंड देतो तेव्हा आम्ही अंतःकरणाच्या ज्या महत्वपूर्ण निवडी केल्या पाहिजेत त्याविषयी आपण चर्चा करू या.

## सोडून देण्याचा गुण

**उत्पत्ति 50:15-21**

**15 आपला बाप मेला हे मनात आणून योसेफाचे भाऊ म्हणू लागले, "आता योसेफ कदाचित आमचे वैर करील व आपण त्याचे जे वाईट केले त्याचे तो पुरे उट्टे काढील."**

**16 त्यांनी योसेफाला सांगून पाठवले की, "आपल्या पित्याने मरणापूर्वी आम्हांला आज्ञा केली ती अशी:**

**17 तुम्ही योसेफाला सांगा, तुझ्या भावांनी तुझे वाईट केले हा त्यांचा अपराध व पातक यांची क्षमा कर; आता आपल्या पित्याच्या देवाचे जे आम्ही दास, त्या आमचा अपराध क्षमा करा अशी आम्ही विनंती करतो." हे त्यांचे भाषण ऐकून योसेफाला रडू आले.**
**18 तेव्हा त्याचे भाऊ स्वतः त्याच्याकडे जाऊन त्याच्या पाया पडून म्हणाले, "आम्ही आपले दास आहोत."**
**19 योसेफ त्यांना म्हणाला, "भिऊ नका, मी का देवाच्या ठिकाणी आहे?**
**20 तुम्ही माझे वाईट योजले, पण आज पाहता त्याप्रमाणे अनेक लोकांचे प्राण वाचावे म्हणून देवाने ते चांगल्यासाठीच योजले होते.**
**21 तर आता भिऊ नका; मी तुमचे व तुमच्या मुलाबाळांचे संगोपन करीन." याप्रकारे त्याने त्यांच्याशी ममतेने बोलून त्यांचे समाधान केले.**

आपल्या भावांचा, ज्यांनी त्याच्यावर भयंकर अन्याय केला होता, सूड घेण्याची किती उत्तम संधी योसेफाला मिळाली होती. भाऊ सर्वात वाईट अपेक्षित होते. आणि तरीही, आपण पाहतो त्याप्रमाणे, योसेफाच्या मनात त्याच्या भावांबद्दल, त्यांनी त्याच्याशी जे केले त्याबद्दल वाईट भावना, द्वेष किंवा कटुता दिसून येत नाही. त्याने त्या गोष्टी फार पूर्वी सोडून दिल्या होत्या. त्याने मोठ्या, आणि उत्तम दृष्टिकोनातून त्याकडे पाहिले, जे देवाने पाहिले ते त्याने पाहिले. योसेफाप्रमाणे, आपल्याला ज्याने दुखाविले आहे त्याला सोडून देण्याची, आपण जाणीवपूर्वक निवड केली पाहिजे. ज्याद्वारे ते अडखळण आले त्या व्यक्तीस (अथवा लोकांस) आम्ही जाऊ द्यावे, क्षमा करावी. जे काही बोलले गेले आणि करण्यात आले ते विसरून जावे.

परमेश्वराच्या दृष्टीकोनातून गोष्टी पहा. "त्यांनी माझ्याशी असे का केले?" "या सर्व गोष्टींमुळे काय होणार?" "त्यांनी माझ्यावर कसा अन्याय केला हे त्यांना कधी कळणार?" या सर्व प्रश्नांची उत्तरे जरी आपल्याजवळ नसली तरीही ते सोडून देण्याची निवड करावी. हा विश्वास धरा की या सर्व गोष्टींमधून परमेश्वर काहीतरी चांगले आणि उत्तम असे करेल आणि आपण या अडखळणास आपल्या अंतःकरणात

जागा देणार नाही. आपली प्राथमिकता आपल्या अंतःकरणाचे रक्षण करणे आहे आणि म्हणून ते सोडून देण्याची आपण जाणीवपूर्वक निवड करता. आपण अडखळण स्वीकार न करण्याची निवड करता.

## परमेश्वराला तुमचा न्याय करू द्या

**रोमकरांस पत्र 12:17-21**

**17 वाइटाबद्दल वाईट अशी कोणाची फेड करू नका. सर्व माणसांच्या दृष्टीने जे सात्त्विक ते करण्याकडे लक्ष ठेवा.**

**18 शक्य तर सर्व माणसांबरोबर तुमच्याकडून होईल तितके शांतीने राहा.**

**19 प्रिय जनहो, सूड उगवू नका, तर देवाच्या क्रोधाला वाट द्या कारण असा शास्त्रलेख आहे की, “सूड घेणे माझ्याकडे आहे, मी फेड करीन,” असे प्रभू म्हणतो.**

**20 उलटपक्षी, “तुझा शत्रू भुकेला असल्यास त्याला खायला दे तान्हेला असल्यास त्याला प्यायला दे कारण असे केल्याने तू त्याच्या मस्तकावर निखाऱ्यांची रास करशील.”**

**21 वाइटाने जिंकला जाऊ नकोस, तर बऱ्याने वाइटाला जिंक.**

आपण अडखळलेले असतांना जर आपण रोमकरांस पत्र 12:17-21 मधील सूचनांचे पालन केले तर आपण या गोष्टी करू:

- आम्हास दुखविणाऱ्याचा आम्ही सूड घेणार नाही.
- ज्याने आम्हास दुखविले आहे त्याच्याशी आपण शांतीने राहण्याची निवड करतो.
- ज्याने आम्हास दुखविले आहे त्याचे आम्ही चांगले करतो आणि त्यास आशीर्वाद देतो.

जेव्हा आपण या गोष्टी करतो, तेव्हा आपण आपल्या मार्गाने न जाता देवाला कार्य करण्यास परवानगी देतो. तो नीतिमान न्यायाधीश आहे, जो आपली अंतःकरणे पाहतो आणि आमचा हेतू काय आहे ते जाणतो. जर आपण त्याच्या हातात सर्वकाही देण्याची निवड केली तर

तो आपल्याला योग्य न्याय देईल.

आणि हेच उदाहरण येशूने आपल्यासमोर मांडले आहे :

**1 पतरस 2:23**
**त्याची निंदा होत असता त्याने उलट निंदा केली नाही; दुःख भोगत असता त्याने धमकावले नाही; तर यथार्थ न्याय करणाऱ्याकडे स्वतःला सोपवून दिले.**

## अभिमानाला तुमच्या हृदयावर राज्य करू देऊ नका

आम्ही आपल्या अडखळणास धरून राहतो कारण आमचा अहंकार दुखावला आहे.

**मत्तय 11:28-30**
**28 अहो कष्टी व भाराक्रांत जनहो, तुम्ही सर्व माझ्याकडे या म्हणजे मी तुम्हांला विसावा देईन.**
**29 मी जो मनाचा सौम्य व लीन आहे त्या माझे जू आपणांवर घ्या व माझ्यापासून शिका म्हणजे 'तुमच्या जिवांस विसावा मिळेल.'**
**30 कारण माझे जू सोयीचे व माझे ओझे हलके आहे."**

येशूने म्हटले की तो सौम्यतेने, नम्रतेने, दीनतेने, आणि विनम्र अंतःकरणाने वागला. आम्ही त्याच्याद्वारे शिकले पाहिजे आणि या बाबतीत त्याचे अनुसरण केले पाहिजे.

जेव्हा आम्ही येशूसमान अंतःकरणात नम्रता व विनय राखून चालतो, तेव्हा आम्ही अडखळू शकत नाही.

येशूने सांगितलेल्या या दाखल्याचा विचार करा

**लूक 14:7-11**
**7 तेव्हा आमंत्रित लोक मुख्य मुख्य आसने कशी निवडून घेत आहेत हे पाहून तो त्यांना दाखला देऊन म्हणाला,**
**8 "कोणी तुला लग्नाच्या मेजवानीचे आमंत्रण केले तर मुख्य आसनावर बसू नकोस; कदाचित तुझ्यापेक्षा अधिक योग्यतेच्या माणसाला त्याने आमंत्रण केले असेल;**

**[9] मग ज्याने तुला व त्याला आमंत्रण केले तो येऊन तुला म्हणेल, 'ह्यांना जागा दे तेव्हा तू लाजेने अगदी खालच्या जागेवर जाऊन बसशील.**
**[10] पण तुला आमंत्रण असल्यास अगदी खालच्या जागेवर जाऊन बस; म्हणजे ज्याने तुला आमंत्रण केले तो येऊन तुला म्हणेल, 'मित्रा, वर येऊन बस'; म्हणजे तुझ्याबरोबर भोजनास बसलेल्या सर्वांसमोर तुझा मान होईल.**
**[11] कारण जो कोणी स्वतःला उंच करतो तो नमवला जाईल; व जो स्वतःला नमवतो तो उंच केला जाईल."**

प्रभु येशू आपल्याला जाणीवपूर्वक नम्रतेने आणि दीनतेने वागण्यास शिकवित आहे. अशाप्रकारे चालावे की आपण ठेच खाऊ शकणार नाही. जेव्हा तुम्ही लीन असता (मनाने नम्र), तेव्हा तुम्हाला कोणीही कमी लेखू शकत नाही! आपल्याला दुखावण्याची त्यांना संधी मिळत नाही. जर तुम्हाला कोणी खाली पाडण्यास पाहिले तर तुमचे हृदय आधीच त्यापेक्षा खालच्या ठिकाणी असल्यामुळे आपला अपमान होऊ शकत नाही.

ख्रिस्ती पुढारी म्हणून जेव्हा आपला अभिमान दुखावला जातो तेव्हा आपले दुखावले जाणे सहज आहे. आम्ही अपेक्षा करतो की आमच्या पदव्यांद्वारे लोकांनी आम्हास बोलवावे, आणि जेव्हा कोणी तसे करीत नाही, तेव्हा आपण नाराज होतो, दुखावतो. आमची अपेक्षा असते की आम्हाला समोरच्या रांगेत बोलविले जावे आणि सभेत सर्वोत्तम बैठक दिली जावी आणि जर तसे झाले नाही तर आम्ही दुखावतो. आम्हास अपेक्षा असते की आम्हास मान्यता मिळावी, मानसन्मान मिळावा आणि आमच्या सर्व बहुमानांची घोषणा केली जावी आणि जेव्हा तसे होत नाही तेव्हा आम्ही अडखळतो, दुखावतो. ही अडखळणे आपल्या अंतःकरणात येतात कारण आपण अभिमानास आपल्या अंतःकरणांवर राज्य करू देतो. त्याऐवजी, जर येशूप्रमाणे आपण नम्रतेने व दीन अंतःकरणाने वागलो, तर आम्हाला उत्तम वर्तणूक दिली जावी अशी आपण अपेक्षा करीत नाही, आणि म्हणूनच आपल्याला अडखळण्याची संधी नसते.

आपण घेतलेले आणखी दोन महत्त्वाचे अंतःकरणाचे निर्णय:

1) दुखावलेल्या अंतःकरणाने काम न करणे

2) प्रीतीत चालण्याची निवड करणे.

आम्ही पुढील दोन प्रकरणांमध्ये त्यांस स्वतंत्रपणे संबोधित करू या.

## मनन

1) अडखळणाने आपल्या अंतःकरणात प्रवेश करू नये म्हणून आपल्या अंतःकरणाचे रक्षण करणे महत्त्वाचे का आहे?

2) आपण अडखळणांचा त्याग केला आहे का? आपण ज्या गोष्टींस धरून ठेविले आहे त्याबद्दल आपले हृदय शुद्ध, स्वच्छ करण्यासाठी प्रार्थना करण्याची आणि परमेश्वराला विनंती करण्याची आपल्याला गरज आहे का?

3) जेव्हा तुम्ही दुखावलेले असता तेव्हा या गोष्टी करा. जेव्हा रोमकरांस पत्र12:17-21 मध्ये नमूद केलेले एखादे अडखळण आपल्यापुढे मांडले जाते तेव्हा आपल्या तीन "प्रथम प्रतिक्रियांचा" आढावा घ्या.

4) आपण जाणीवपूर्वक येशूसारखे "दीन व नम्र हृदय" कसे बाळगू शकता, जेणेकरून तुमचा अहंकार कशानेही दुखावला जाऊ नये आणि म्हणूनच कशाही पद्धतीने अडखळण्याची संधी मिळू नये.

# 4
# अडखळणांनी प्रेरित होऊन कार्य करू नका

मागील प्रकरणांमध्ये आपण अडखळणास तोंड देत असतांना आपल्याला आवश्यक असलेल्या तीन महत्त्वपूर्ण अंतःकरणाच्या निवडींबद्दल चर्चा केली आहे:

1) सोडून द्या.
2) रोमकरांस पत्र 12:17-21 च्या अनुषंगाने प्रतिसाद द्या आणि परमेश्वर तुम्हाला न्याय देईल.
3) अभिमानास आपल्या मनावर राज्य करू देऊ नका.

या अध्यायात जेव्हा आपण दुखावतो तेव्हा आपण चौथ्या महत्त्वपूर्ण अंतःकरणाच्या निवडींविषयी चर्चा करणार आहोत. आम्ही दुखावलेल्या अंतःकरणाने कार्य न करण्याची जाणीवपूर्वक निवड करतो. यासाठी आत्म-नियंत्रण जरूरी आहे.

## दोन अडखळणे व्यक्तीस योग्य ठरवीत नाहीत

**उपदेशक 10:4**

**तुझ्यावर अधिपतीचा क्रोध झाला तर आपली जागा सोडू नकोस, कारण शांतीने मोठमोठी पापकर्मे टळतात.**

आधुनिक काळाच्या दृश्याची कल्पना करा. तुम्ही कामावर गोंधळलात असे समजू. कदाचित तुम्ही एक लहानशी गोष्ट करण्यात अयशस्वी ठरलात किंवा ती एक गंभीर आणि जास्त नुकसान होणारी चूक असू शकते. तुमचा वरिष्ठ अधिकारी तुमच्यावर चिडला आहे. राग

आणणारे ई-मेल, शाब्दिक अपमान, कमी दर्जा दाखविणे, बढतीसाठी नापसंत करणे याद्वारे तो आपली नाराजी व्यक्त करत आहे. अर्थात तुम्ही त्याच्या प्रतिक्रियेमुळे दुखावला आहात, अडखळला आहात. तुम्हाला वाटते की तो उगाच भडकत आहे. तुम्हाला सोडून जावेसे, बाहेर पडावेसे, किंवा निषेध करावासा वाटतो. तुम्ही त्याला सांगू इच्छिता की जे त्याचे तुमच्याबरोबरील वागणे आहे त्यास तुम्ही पात्र नव्हता. दुसरीकडे पवित्र शास्त्र आपल्याला *"आपली जागा सोडू नकोस"* असे प्रोत्साहन देते. आपल्या अडखळणाच्या भावनेने प्रेरित होऊन प्रतिक्रिया देऊ नका. शांत राहणे, सौम्य, नम्र होणे आणि अशा परिस्थितीत मन स्थिर ठेवल्यास सर्वकाही सुरळीत होईल.

## अडखळलेले अंतःकरण म्हणजे जखमी हृदय

अडखळलेले हृदय म्हणजे जखमी हृदय. दुःखी अंतःकरण आणि “भग्न” आत्मा.

**नीतिसूत्रे 17:22**
**आनंदी हृदय हे उत्कृष्ट औषध होय; खिन्न हृदय हाडे शुष्क करते.**

भग्न आत्मा हाडे शुष्क करतो. याचा अर्थ असा आहे की भग्न आत्मा “आपला जीवनरस शोषून घेतो,” आपणास पिळून काढतो आणि खरोखर आपणास उध्वस्त करीत असतो.

**नीतिसूत्रे 18:14**
**मनुष्याचे चित्त आपली व्याधी सहन करते; पण व्याकूळ चित्त कोणाच्याने प्रसन्न करवेल?**

आंतरिक व्यक्ती हीच आपल्याला आव्हानात्मक काळात, आजारपणाच्या काळात टिकवून ठेवते. पण जर आंतरिक व्यक्ती जखमी, दुःखी आणि भग्न असेल, तर आव्हानात्मक काळात टिकून राहण्यासाठी जे आवश्यक आहे ते त्या व्यक्तीकडे नसते.

म्हणून, जर आपण अडखळलो आणि ते आपल्या अंतःकरणात जाऊ दिले, तर आम्ही सामर्थ्यवान नसून दुर्बल आहोत. आम्ही खालच्या स्तरावर आहोत आणि खरोखर आम्ही आमचे सर्वोत्तम देत नाही

आमचा कल चुकीचे निर्णय घेण्याकडे आणि हीन दर्जाची निवड करण्याकडे असतो. आपल्या अडखळणांमुळे आपण बऱ्याचदा आंधळे होतो. आम्हास वाटत असलेल्या दुःखामुळे आमची निर्णयशक्ति अंधूक होते.

जेव्हा आपण दुःखी होऊन कार्य करतो तेव्हा आपला इतरांना दुखावण्याकडे कल असतो. दुखावलेले लोक इतरांना दुखावतात. कधीकधी हे बचावाचा एक मार्ग म्हणून केले जाते, परंतु असे असले तरी आम्ही आपल्या जवळच्या लोकांना दुखवत असतो.

म्हणून अडखळण न बाळगणे उत्तम आहे. तथापि, तुम्ही अडखळला असाल, तर आत्मसंयम बाळगा, आणि  दुखाविलेल्या अंतःकरणाने कार्य न करण्याची निवड करा. परमेश्वरास तुम्हास बरे करण्यासाठी आणि तुमची मदत करण्यासाठी विनंती करा की तुम्ही तुमच्या अंतःकरणातील अडखळण सोडून द्यावे, क्षमा करावी आणि ते अंतःकरण शुद्ध आणि स्वच्छ करावे. मग पुढे व्हावे.

## अडखळणामुळे कटुत्व जन्मास येते

जर आपण आपल्या अंतःकरणातील अडखळणांवर त्वरित उपाय केला नाही तर ते कटुत्व, अक्षमा, क्रोध आणि द्वेष यासारख्या चुकीच्या भावनांना जन्म देईल. ज्या व्यक्तीने आपल्याला दुखावले त्या व्यक्तीबद्दल (किंवा लोकांबद्दल) आपल्या मनात कटुत्व उत्पन्न होते.

आपल्या अंतःकरणात कटुत्व बाळगणे म्हणजे काय?

**इब्री 12:14,15**
**14 सर्वांबरोबर 'शांततेने राहण्याचा' व ज्यावाचून कोणालाही प्रभूला पाहता येत नाही ते पवित्रीकरण मिळवण्याचा 'झटून प्रयत्न करा.'**
**15 देवाच्या कृपेला कोणी उणे पडू नये, ज्यामुळे पुष्कळ जण बिघडून जातील असे कोणतेही "कडूपणाचे मूळ" अंकुरित होऊन उपद्रव देणारे होऊ नये.**

कटुता ही मुळासारखी असते जी जर तपासली नाही तर ती मोठी होऊन आपल्यासाठी सर्व प्रकारचे संकट निर्माण करेल. हे आपल्याद्वारे त्याचा प्रभाव इतरांपर्यंतही पोहोचवेल, ज्यामुळे आपण जे अनुभवत आहोत त्याचा परिणाम त्यांच्यावरही होऊ शकतो. नियंत्रण न राखल्यास कटुत्व संक्रामक बनते आणि पसरते. इतरही आपल्यासारखे कटू होतात.

इब्री लोकांस पत्र 12:15 मध्ये कटुत्वाविषयी चेतावणी दिली आहे. ती देवाच्या कृपेची कमतरता न होऊ देण्याच्या इशाऱ्यासह स्पष्ट केली गेली आहे. परमेश्वर विपुल कृपेचा देव आहे. त्याच्याकडे सर्वांसाठी ओसंडून वाहणारी आणि अफाट कृपा उपलब्ध आहे. तथापि, आपल्या अंतःकरणातील कटुत्व आपल्याला त्याच्या अद्भुत कृपेद्वारे देव आपल्यासाठी, आपल्यामध्ये आणि आपल्याद्वारे काय करू शकतो ते प्राप्त करण्यापासून वंचित करू शकते. नियंत्रण न ठेवल्यास, हे कटुत्व अक्षमेस कारणीभूत ठरते जे नंतर विश्वासाच्या मार्गात अडथळा आणते (मार्क 11:22-25).

नियंत्रित न ठेवल्यास, हे कटुत्व द्वेषास कारणीभूत ठरते. द्वेष आंधळे करतो (1 योहान 2:9,11). जे लोक अंधारात आहेत त्यांच्यासमान ते चाचपडतात, आणि कदाचित आपण कोठे जात आहोत हे आपल्याला कळत नाही, कारण आपण द्वेषामुळे आंधळे आहोत.

द्वेष म्हणजे खून (1 योहान 3:15). जेव्हा आपण कटुत्वाने प्रेरित होऊन कार्य करतो तेव्हा आपण बऱ्याचदा खून करण्याचा प्रयत्न करतो. आम्ही आपल्याला दुखाविणाऱ्या व्यक्तीच्या चारित्र्याचा, प्रतिष्ठेचा, सन्मानाचा खून

करण्यास मागेपुढे पाहत नाही. कधीकधी आम्ही हे सर्व लोकांना सारखेच लागू करतो. आम्ही म्हणतो "प्रत्येकजण असाच असतो." एक अडखळण, जे हृदयात प्रवेश करते, कटुता निर्माण करते ज्यामुळे सर्वांप्रत सामान्य तिरस्कार उत्पन्न होतो.

सर्व नकारात्मक भावनांस जर अंतःकरणातून दूर केले नाही तर त्या आम्हाला त्रास देतील आणि आपले आणखी नुकसान करतील.

## अडखळणांना वाचा देऊ नका

इब्री लोकांस पत्र 12:15 मध्ये नमूद केले आहे की, जर कटुत्वावर नियंत्रण ठेवले नाही तर ते आपल्या मनातून आपल्या सभोवतालच्या लोकांच्या अंतःकरणात प्रवेश करते.

जेव्हा आपण दुखावलेल्या अंतःकरणाने कार्य करतो तेव्हा आम्ही इतरांना अडखळणाची भावना वाटप करणे, वितरित करणे आणि प्रसार करणे सुरू करतो. त्यांची विचारसरणी, आणि दृष्टीकोन देखील आम्ही त्यांना सांगत असलेल्या गोष्टींनी धूसर तो. सर्व नकारात्मक भावनांस जर अंतःकरणातून दूर केले नाही तर त्या आम्हाला त्रास देतील आणि आपले आणखी नुकसान करतील.

**रोमकरांस पत्र 16:17**
**आता बंधुजनहो, मी तुम्हांला विनंती करतो की, तुम्हांला जे शिक्षण मिळाले आहे त्याविरुद्ध जे फुटी व अडथळे** (ग्रीक *'स्कॅन्डेलॉन'*) **घडवून आणत आहेत त्यांच्यावर लक्ष ठेवा आणि त्यांच्यापासून दूर व्हा.**

## अडथळा किंवा अडखळण न आणण्याचा संकल्प करा

**रोमकरांस पत्र 14:10,13**
**10 तर मग तू आपल्या भावाला दोष का लावतोस? किंवा तू आपल्या भावाला तुच्छ का मानतोस? कारण आपण सर्व ख्रिस्ताच्या न्यायासनासमोर उभे राहणार आहोत.**

**[13] ह्याकरता आपण ह्यापुढे एकमेकांना दोष लावू नये तर असे ठरवून टाकावे की, <u>कोणी आपल्या भावापुढे ठेच लागण्यासारखे</u>** (ग्रीक *'प्रोस्कोमा'*) **काही किंवा <u>अडखळण</u>** (ग्रीक *'स्कॅन्डेलॉन'*) **ठेवू नये.**

रोमकरांस पत्र 14 मध्ये, पौल हे सांगत आहेत की भिन्न विश्वासणारे कदाचित खानपान, विशेष दिवस इत्यादी गोष्टी वेगळ्याप्रकारे पाहत असतील. त्यानंतर त्यांनी आम्हाला विश्वासणारे म्हणून सल्ला दिला की या बाबींमध्ये एकमेकांचा न्याय करू नये. आपल्यातील प्रत्येकाने आपल्या मनात पूर्ण मनाने निश्चय केला पाहिजे आणि हे जाणले पाहिजे की आपण प्रभूला सर्व गोष्टींचा हिशेब देऊ. तथापि, आपल्याकडे हे स्वातंत्र्य असताना, आपण एखादे अडखळण टाकू नये किंवा असे काही करू नये ज्यामुळे दुसरा विश्वासणारा अडखळून पडेल.

रोमकरांस पत्र 14:13 मध्ये *"अडखळण"* हा ग्रीक शब्द *'प्रोस्कोमा'* असा आहे ज्याचा अर्थ "एखादा अडथळा ज्यावर एखाद्याच्या पायाला ठेच लागेल." "पडण्याचे कारण" हे शब्द आपण यापूर्वी पाहिलेल्या ग्रीक शब्दावरून *'स्कॅन्डेलॉन'* वरून आले आहेत.

विश्वासणारे म्हणून आपण एकमेकांना अडथळा किंवा अडखळण आणू नये.

जेव्हा आपण प्रभुची जागा घेण्याचा प्रयत्न करतो आणि व्यर्थ गोष्टींमध्ये एकमेकांस दोष देऊ लागतो तेव्हा आम्ही एकमेकांना अडखळण आणतो आणि दुखावतो (रोमकरांस पत्र 14:4) आणि जेथे स्वतः प्रभुने आपल्याला स्वतःच्या निवडी करण्याचे आणि त्याला जबाबदार असण्याचे स्वातंत्र्य दिले आहे (रोमकरांस पत्र 14:12).

जेव्हा आपण तिरस्कार दाखवतो, अपमानित करतो, तुच्छ मानतो, निंदा करतो, आपण चांगले आहोत असे समजतो आणि

दुसऱ्या व्यक्तीला कमी लेखतो तेव्हा आपण एकमेकांना अडखळण आणतो आणि दुखावतो.

इतके सर्व म्हटल्यानंतर व केल्यानंतर, आपण अडखळणाचा स्वीकार न करण्याची व अडखळणाने प्रेरित होऊन कार्य न करण्याची हेतुपुरस्सर निवड करणे आवश्यक आहे.

## मनन

1) दुखावलेले हृदय हे जखमी हृदय आहे. मनात दुःख किंवा कटुत्व बाळगल्याने आपल्यावर वैयक्तिकरित्या कसा परिणाम होतो?

2) अडखळणातून जन्मलेल्या काही नकारात्मक भावना काय आहेत? हे आपल्यावर आणि आपल्या सभोवतालच्या लोकांवर कसे परिणाम करतात?

3) रोमकरांस पत्र 14:10,13 नुसार आपण अडखळू नये किंवा दुखविले जाऊ नये म्हणून आपण कोणत्या दोन गोष्टी करू नयेत?

# 5
# प्रेम आम्हास मुक्त करते

मागील अध्यायांमध्ये आपण अडखळणास तोंड देत असतांना आपल्याला आवश्यक असलेल्या चार महत्त्वपूर्ण अंतःकरणाच्या निवडींबद्दल चर्चा केली आहे:

1) सोडून द्या.

2) रोमकरांस पत्र 12:17-21 च्या अनुषंगाने प्रतिसाद द्या आणि परमेश्वर तुम्हाला न्याय देईल.

3) अभिमानास आपल्या मनावर राज्य करू देऊ नका.

4) दुखावलेल्या अंतःकरणाने कार्य करू नका.

या अध्यायात जेव्हा आपण दुखावतो तेव्हा आपण घेतलेल्या पाचव्या महत्त्वपूर्ण अंतःकरणाच्या निवडींविषयी चर्चा करण्यात आली आहे. आम्ही प्रेमात चालण्याची जाणीवपूर्वक निवड करतो. प्रेम आपली अंतःकरणे स्वच्छ, शुद्ध आणि मुक्त ठेवते.

## प्रेम आपले अंतःकरण शुद्ध करते

**1 योहान 2:10**
**आपल्या बंधूवर प्रीती करणारा प्रकाशात राहतो, आणि त्याच्या ठायी अडखळण** (ग्रीक *'स्कॅन्डेलॉन'*) **नसते.**

अडखळणाचे सर्वात उत्तम औषध म्हणजे आपल्याद्वारे देवाचे प्रेम वाहावे.

जेव्हा आपण दुखावतो, अपमानित होतो आणि रागावतो तेव्हा

आपल्याला त्याची वेदना जाणवते. परंतु त्या क्षणी, आपण देवाच्या प्रेमाला आमंत्रित करतो जे *"पवित्र आत्म्याद्वारे आपल्या अंतःकरणात ओतले गेले आहे"* (रोमकरांस पत्र 5:5) आपल्याद्वारे आणि ज्या व्यक्तीने (किंवा लोकांनी) आपल्याला अपमानित केले आहे त्यांच्याद्वारे प्रवाहित व्हावे.

जेव्हा आपण हे करण्याची निवड करतो आणि प्रेमळ अंतःकरण बाळगतो तेव्हा आपण प्रकाशात राहतो. देवाचा प्रकाश आपल्या व्यक्तिमत्वास भरून टाकतो. आपली अंतःकरणे स्वच्छ, शुद्ध आणि मुक्त करतो. अडखळणास *('स्कॅन्डेलॉन')* आपल्यात जागा राहत नाही. असे काही नाही जे आपल्यास सापळ्यात अडकवू शकेल किंवा आपल्याला अडखळण आणू शकेल. प्रेम अडखळणास संधी देत नाही. प्रेम आणि अडखळण एकत्र राहू शकत नाही.

आपल्या अंतःकरणातील परमेश्वराच्या प्रेमामुळे, ज्यांनी आम्हाला अडखळविले, दुखविले आहे त्यांना आपण क्षमा करतो आणि आशीर्वाद देतो.

आता आपण त्या व्यक्तीशी (किंवा लोकांशी) बोलू शकतो ज्याने आपल्याला दुखविले आहे, त्यांच्यासाठी आपल्या अंतःकरणात प्रीतीशिवाय दुसरे काहीही नाही. त्यांनी काय केले ज्यामुळे आम्ही दुःखी झालो हे आम्ही दाखवू शकतो. आणि तसे आम्ही राग, दुखापत, सूडबुद्धी किंवा वैरबुद्धी न राखता करू शकतो. आम्ही ते प्रेमाने आणि क्षमाशील भावनेने करू शकतो.

## प्रीति सर्वांवर विजय मिळविते

**नीतिसूत्रे 10:12**
**द्वेष कलह उत्पन्न करतो; प्रीती सर्व अपराधांवर झाकण घालते.**

**नीतिसूत्रे 17:9**
**जो इतरांच्या अपराधावर झाकण घालतो तो प्रेमाची वृद्धी करतो; पण जो गत गोष्टी घोकत बसतो त्याला मित्र अंतरतात.**

जेव्हा आपण एखाद्या अडखळणास उत्तर म्हणून प्रेमाने वागतो, तेव्हा आपण आपल्या विरोध्याचा सूड घेण्याचा विचार करीत नाही. आम्ही ज्यामुळे दुखावलो त्यांच्या चुकीच्या कृतीवर किंवा त्यांनी केलेल्या सर्व गोष्टींवर पांघरूण घालण्याचा प्रयत्न करतो.

आम्ही इतर लोकांशी त्यांच्याविषयी बोलतांना शब्दांबाबत सावध राहतो. ज्यायोगे त्यांच्या नावाची बदनामी होईल, त्यांची नाचक्की होईल, किंवा त्यांचा अपमान होईल अशा रीतीने आम्ही त्या प्रकरणाची पुनरावृत्ती करण्यास नकार देतो. आम्ही सावध राहतो की आमच्या शब्दांनी त्यांच्यात आणि इतरांमध्ये फूट पडू नये.

हेच ते प्रेम आहे जे सर्वांना जिंकते. हेच प्रेम आहे जे अडखळणावर विजय मिळवते. या प्रेमामुळे सापळा आणि पाशावर विजय मिळतो जे आमच्यापुढे टाकण्याची शत्रू वाट पाहत होता.

## काहीही का होईना, प्रीति करा

**1 योहान 4:11**
**प्रियजनहो, देवाने जर आपल्यावर अशा प्रकारे प्रीती केली तर आपणही एक-मेकांवर प्रीती केली पाहिजे.**

अडखळण आल्यास परमेश्वराच्या प्रेमाने प्रेम करणे हे लहान काम नाही. आमचा अपराधी आमच्याकडून अशा प्रकारच्या प्रतिक्रियेस पात्र नाही असे आपल्याला वाटण्याची अनेक कारणे आहेत. परंतु जेव्हा आपण स्वतःला आठवण करून देतो की जर परमेश्वर आपल्यावर कशा अवर्णनीय आणि अमर्याद रूपात प्रेम करतो तर आपण आपल्या अपराध्यावर, अडखळण आणणाऱ्यावरही असेच प्रेम करण्याशिवाय आपल्याकडे

दुसरा पर्याय नसतो. आम्हाला ज्याने नाराज केले आहे, दुखविले आहे, त्याला (त्यांना) आम्ही प्रीति करतो, मग ते काहीही असो.

## कृतीद्वारे प्रीति, फक्त शब्दांत नाही

**1 योहान 3:18**
**मुलांनो, आपल्या शब्दांनी किंवा जिभेने नव्हे, तर कृतीने व सत्याने आपण प्रीती करावी.**

**रोमकरांस पत्र 12:9**
**प्रीतीमध्ये ढोंग नसावे; वाइटाचा वीट माना; बऱ्याला चिकटून राहा.**

ही केवळ बौद्धिक किंवा सिद्धांत मांडून आम्ही सांगत असलेली गोष्ट नाही तर वास्तविक जीवनात आम्ही जे काही करतो ते आहे. आपले प्रेम निखळ आहे. ते खरे आहे. ते वास्तव आहे. ते आमच्या हृदयातून वाहते. ते भूतकाळास मिटवते. हे अपराध्याला त्यांच्या अपराधातून मुक्त करते. आमच्या जगण्याचा हा मार्ग आहे.

प्रेम केवळ आपल्या अपराध्यालाच मुक्त करीत नाही, तर ते आपल्याला देखील मुक्त करते. आम्ही शुद्ध ,स्वच्छ आणि मुक्त होतो.

प्रेम आपल्याला अडखळणाच्या भावनेच्या वर जगण्यासाठी मुक्त करते. नेहमी अडखळणांच्या वर जगा. नेहमी प्रेमात जीवन जगा.

## मनन

1) असे कोणी आहे का (किंवा काही लोक) ज्यांनी तुम्हाला नाराज केले, दुखविले आहे, ज्याला तुम्हाला प्रीतीने मुक्त करण्याची गरज आहे? हा अध्याय वाचण्यासाठी थोडा वेळ काढून त्या व्यक्तीवर (किंवा लोकांवर) प्रत्येक प्रेम-कृती लागू करा?

# आपणास माहीत आहे का की देव आपणावर प्रीती करतो?

सुमारे 2000 वर्षांपूर्वी, देव मानव म्हणून या जगात आला. त्याचे नाव येशू आहे. तो सिद्ध पापरहित जीवन जगला. येशू हा देहधारी परमेश्वर होता, म्हणून जे काही त्याने म्हटले आणि केले, त्याद्वारे त्याने देवास आमच्यावर प्रगट केले. तो जी वचने बोलला, तो देवाची वचने बोलला. त्याने जी कार्ये केली, ती देवाची कार्ये होती. येशूने पृथ्वीवर अनेक चमत्कार केले. त्याने रोग्यांस व क्लेशितांस बरे केले. त्याने आंधळ्यांचे डोळे उघडले, लंगड्यांस चालविले आणि प्रत्येक प्रकारचे रोग व आजार त्याने बरे केले. भाकरीच्या तुकड्यास आश्चर्यजनकरित्या बहुगुणित करून त्याने भुकेल्यास अन्न दिले, वादळ शांत केले आणि इतर अनेक अद्‌त गोष्टी केल्या.

**ह्या सर्व गोष्टी आम्हास प्रगट करतात की देव चांगला परमेश्वर आहे ज्याची इच्छा आहे की लोकांनी बरे, स्वस्थ, आरोग्यसंपन्न आणि आनंदित असावे. देव लोकांच्या गरजा पूर्ण करू इच्छितो.**

तर, देवाने मनुष्य बनण्याचा आणि आमच्या जगात प्रवेश करण्याचा निर्णय का घ्यावा? येशू का आला?

आम्ही सर्वांनी पाप केले आहे आणि अशा गोष्टी केल्या आहेत ज्या आम्हास उत्पन्न करणाऱ्या देवासमोर अमान्य आहेत. पापाचे परिणाम आहेत. पाप हे देव आणि मानवातील एका मोठ्या भिंतीसारखे आहे जी पार करता येत नाही. पाप हे आम्हास देवापासून वेगळे करते. ज्याने आम्हास उत्पन्न केले आहे त्यास जाणण्याच्या आणि त्याच्यासोबत अर्थपूर्ण नाते स्थापन करण्याच्या मार्गात ते आम्हास अडखळण आणते. म्हणून, आमच्यापैकी कित्येक जण इतर गोष्टींनी हे रिक्त स्थान भरून टाकण्याचा प्रयत्न करतात.

आमच्या पापांचा दुसरा परिणाम देवापासून सदाकाळसाठी अलग होणे होय. देवाच्या न्यायालयात, पापाचे वेतन मरण आहे. मृत्यू देवापासून दूर नरकात सार्वकालिक ताटातूट आहे.

पण, सुवार्ता ही आहे की आपण पापांपासून मुक्त राहू शकतो आणि देवाशी पुन्हा नाते स्थापन करू शकतो. बायबल म्हणते, ***"पापाचे वेतन मरण आहे, पण देवाचे कृपादान आपल्या प्रभु येशू ख्रिस्तामध्ये सार्वकालिक जीवन आहे"* (रोमकरांस पत्र 6:23).** येशूने जेव्हा वधस्तंभावर आपला प्राण दिला, तेव्हा त्याने संपूर्ण जगाच्या पापांची किंमत चुकविली, मग तीन दिवसानंतर तो पुन्हा जीवंत झाला, त्याने अनेकांस स्वतःला जीवंत दाखविले आणि मग तो स्वर्गास परतला.

देव प्रीती आणि दयेचा देव आहे. त्याची अशी इच्छा नाही की कोणीही व्यक्तीने नरकात नाश व्हावे. म्हणून तो संपूर्ण मानवजातीस पापापासून आणि त्याच्या स्थायी परिणामांपासून मुक्त होण्याचा मार्ग दाखवावयास आला. तो पाप्यांस तारावयास-आपल्यासारख्या आणि माझ्यासारख्या लोकांस पापापासून आणि सार्वकालिक मृत्यूपासून वाचवावयास आला.

पापांची ही विनामूल्य क्षमा प्राप्त करण्यासाठी, बायबल आम्हास सांगते की आम्ही फक्त एक गोष्ट केली पाहिजे—प्रभु येशू ख्रिस्ताने वधस्तंभावर जे काही केले त्याचा स्वीकार करणे आणि संपूर्ण अंतःकरणाने त्याच्याठायी विश्वास धरणे.

***"त्याच्यावर विश्वास ठेवणाऱ्या प्रत्येकाला त्याच्या नावाने क्षमा मिळेल अशी साक्ष सर्व संदेष्टे त्याच्याविषयी देतात"* (प्रेषितांची कृत्ये 10:43).**

***"की येशू प्रभु आहे असे जर तू आपल्या मुखाने कबूल करशील आणि देवाने त्याला मेलेल्यांतून उठविले असा आपल्या अंतःकरणात विश्वास ठेवशील तर तुझे तारण होईल"* (रोमकरांस पत्र 10:9).**

जर आपण प्रभु येशू ख्रिस्ताठायी विश्वास ठेवला, तर आपण देखील पापांपासून क्षमा प्राप्त करू शकता आणि शुद्ध होऊ शकता.

प्रभु येशू ख्रिस्तामध्ये आणि वधस्तंभावर त्याने आपणासाठी जे काही केले आहे त्याच्यावर विश्वास करण्याचा निर्णय घेण्यात आपली मदत करण्यासाठी खाली एक सोपी प्रार्थना दिलेली आहे. येशूने आपणासाठी काय केले आहे त्याचा स्वीकार व्यक्त करण्यात आणि आपल्या पापांपासून शुद्धता प्राप्त करण्यात ही प्रार्थना आपली मदत करील. ही प्रार्थना केवळ एक मार्गदर्शक आहे. आपण आपल्या शंब्दांत देखील प्रार्थना करू शकता.

*प्रिय प्रभु येशू, आज मला कळले की वधस्तंभावर तू माझ्यासाठी काय केले. तू माझ्यासाठी मरण पत्करलेस: तू तुझे बहुमूल्य रक्त वाहिलेस आणि माझ्या पापांचा दंड चुकविलास, यासाठी की मला क्षमा प्राप्त व्हावी. बायबल मला सांगते की जो कोणी तुजवर विश्वास ठेवील, त्याला त्याच्या पापांची क्षमा केली जाईल.*

*आज, मी तुजवर विश्वास ठेवण्याचा निर्णय घेतो आणि वधस्तंभावर माझ्यासाठी मरण पत्करून व पुन्हा मेलेल्यांतून जीवंत होऊन तू जे काही माझ्यासाठी केलेस, त्याचा मी स्वीकार करतो. मी जाणतो की माझ्या सत्कृत्यांद्वारे मी स्वतःचे तारण साध्य करू शकत नाही, इतर कोणीही मनुष्य माझे तारण घडवून आणू शकत नाही. मी माझ्या पापांची क्षमा कमवू शकत नाही.*

*आज, मी आपल्या अंतःकरणात विश्वास धरतो आणि माझ्या मुखाने हे कबूल करतो की तू मजसाठी मरण पत्करलेस, तू माझ्या पापांची किंमत चुकविलीस, तू पुन्हा मेलेल्यांतून उठलास, आणि तुझ्यावरील विश्वासाद्वारे, मला माझ्या पापांची क्षमा आणि शुद्धता प्राप्त होते.*

*येशू, मी तुझे उपकार मानतो. तुजवर प्रीती करण्यात, तुला आणखी जाणून घेण्यात, आणि तुझ्याप्रत विश्वासू राहण्यात माझी मदत कर.*

*आमेन.*

# ऑल पीपल्स चर्च

बँगलोर शहरात मीठ आणि प्रकाश ठरावे, आणि भारत देशात तसेच संपूर्ण जगातील राष्ट्रांत एक आवाज़ बनणे हा ऑल पीपल्स चर्च चा दृष्टांत आहे.

ऑल पीपल्स चर्च ही एक **येशूवर प्रीती करणारी, वचनावर केंद्रित, आत्म्याने भरलेली**, कौटुंबिक मंडळी, सुसज्जीकरण केंद्र, मिशन ठिकाण आणि जागतिक सुवार्ता केन्द्र आहे.

- एक **कौटुंबिक चर्च** म्हणून, आम्ही ख्रिस्त केंद्रित सहभागित्वामध्ये एक समुदाय म्हणून एकत्र वाढतो, देवाची मंडळी म्हणून प्रेमाने एकमेकांची काळजी घेतो आणि सेवा करतो.
- एक **सुसज्जीकरण केंद्र** म्हणून, आम्ही प्रत्येक विश्वासणाऱ्याला विजयाने जगण्यासाठी, ख्रिस्ताच्या समानतेमध्ये परिपक्व होण्यासाठी आणि त्यांच्या जीवनासाठी देवाचे हेतू पूर्ण करण्यासाठी सक्षम आणि सुसज्ज करतो.
- एक **मिशन स्थळ** म्हणून, आम्ही देवाच्या वचनाद्वारे आणि पवित्र आत्म्याच्या सामर्थ्याच्या अलौकिक प्रकटीकरणाद्वारे येशू ख्रिस्ताच्या संपूर्ण सुवार्तेसह आमच्या शहरास, राष्ट्रास आणि राष्ट्रांना आशीर्वादित करण्यासाठी अर्थपूर्ण सेवेत सहभागी होतो.
- एक **जागतिक सुवार्ता केंद्र** म्हणून, आम्ही धार्मिक पुढाऱ्याचे आणि आत्म्याने भरलेल्या मंडळ्यांचे पालनपोषण करून स्थानिक आणि जागतिक स्तरावर सेवा करतो, जेणेकरून त्यांना देवाच्या राज्यासाठी त्यांच्या क्षेत्रांवर प्रभाव टाकता यावा.

एपीसी मध्ये, आम्ही देवाचे संपूर्ण वचन कुठल्याही प्रकारची तडजोड न करता, पवित्र आत्म्याच्या अभिषेकाने व प्रकटीकरणाने सादर करण्याप्रत वचनबद्ध आहोत. आमचा विश्वास आहे की उत्तम संगीत, रचनात्मक सादरीकरण, बुद्धिमत्तापूर्ण तत्वसमर्थन, समकालीन सेवाकार्याच्या पद्धती, आधुनिक तंत्रज्ञान इत्यादी गोष्टी पवित्र आत्म्याची चिन्हे, चमत्कार, अद्‌त कार्ये, आणि पवित्र आत्म्याच्या कृपादानांद्वारे वचनाची घोषणा करण्याच्या देवाने नेमलल्या पद्धतीची जागा घेऊ शकत नाहीत (1 करिंथ 2:4,5; इब्री 2:3,4). आमचा विषय येशू आहे, आमची विषयवस्तु वचन आहे, आमची पद्धत पवित्र आत्म्याचे सामर्थ्य आहे, आमचा आवेश लोक आहेत, आणि आमचे ध्येय ख्रिस्तासमान परिपक्वता आहे.

आमचे मुख्यालय बँगलोर येथे आहे, पण ऑल पीपल्स चर्चच्या भारतात कित्येक ठिकाणी शाखा आहेत. ऑल पीपल्स चर्चची वर्तमान यादी आणि संपर्क सूचना यासाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी **apcwo.org/locations** किंवा या पत्त्यावर ई-मेल पाठवावा **contact@apcwo.org.**

# विनामूल्य प्रकाशने

A Church in Revival
A Real Place Called Heaven
A Time for Every Purpose
Ancient Landmarks
Baptism in the Holy Spirit
Being Spiritually Minded and Earthly Wise
Biblical Attitude Towards Work
Breaking Personal and Generational Bondages
Change
Code of Honor
Divine Favor
Divine Order in the Citywide Church
Don't Compromise Your Calling
Don't Lose Hope
Equipping the Saints
Foundations (Track 1)
Fulfilling God's Purpose for Your Life
Gifts of the Holy Spirit
Giving Birth to the Purposes of God
God Is a Good God
God's Word—The Miracle Seed
How to Help Your Pastor
Integrity
Kingdom Builders
Laying the Axe to the Root
Living Life Without Strife
Marriage and Family
Ministering Healing and Deliverance
Offenses—Don't Take Them
Open Heavens
Our Redemption
Receiving God's Guidance
Revivals, Visitations and Moves of God
Shhh! No Gossip!
Speak Your Faith
The Conquest of the Mind
The Father's Love
The House of God
The Kingdom of God
The Mighty Name of Jesus
The Night Seasons of Life
The Power of Commitment
The Presence of God
The Redemptive Heart of God
The Refiner's Fire
The Spirit of Wisdom, Revelation and Power
The Wonderful Benefits of Praying in Tongues
Timeless Principles for the Workplace
Understanding the Prophetic
Water Baptism
We Are Different
Who We Are in Christ
Women in the Workplace
Work—Its Original Design

नवीन पुस्तके नियमितपणे प्रकाशित केली जातात. PDF, ऑडियो तसेच इतर स्वरूपात विनामूल्य ऑल पीपल्स चर्च पुस्तके डाऊनलोड करण्यासाठी कृपा करून **apcwo.org/books** या संकेतस्थळास भेट द्यावी. यापैकी अनेक पुस्तके इतर भाषांतही उपलब्ध आहेत. तसेच, विनामूल्य ऑडियो आणि विडियो संदेश, संदेशाचे नोट्स टी.वी. कार्यक्रम आणि इतर अनेक सामुग्रींसाठी आमच्या संकेतस्थळास भेट द्यावी: **apcwo.org/sermons.**

# क्रिसलिस कॉउंसलिंग

क्रिसलिस कॉउंसलिंग लोकांना जीवनातील आव्हानांना तोंड देण्यासाठी आणि त्यावर मात करण्यासाठी वैयक्तिक सल्ला देते. क्रिसलिस कॉउंसलिंग हा व्यावसायिक, प्रशिक्षित आणि अनुभवी ख्रिस्ती सल्लागारांचा संघ आहे.

आमच्या सेवा सर्व वयोगटांसाठी आहेत आणि जीवनातील अनेक आव्हानांना सामोरे जातात.

| | |
|---|---|
| **किशोरवयीन मुलांसाठी** | **वर्तणूक विकार** |
| **वैयक्तिक सल्ला** | **व्यक्तिमत्व विकार** |
| **नातेसंबंधांशी संबंधित आव्हाने** | **मानसिक भावनिक /** |
| **शिक्षेतील उणीव** | **अडचणी** |
| **कामाशी संबंधित समस्या** | **तणाव/आघात** |
| **कुटुंब/संपत्ती/विवाहपूर्व वैवाहिक** | **मद्यपान/अमली पदार्थांचे सेवन** |
| **पालक/मुले/भावंडे/समवयस्क** | **आध्यात्मिक समस्या** |
| | **लाईफ कोचिंग** |

क्रिसलिस कॉउंसलिंग सेवांसाठी शुल्क परवडणारे आणि प्रवेशयोग्य आहेत.

आमच्या प्रशिक्षित सल्लागारांसोबत भेटीची वेळ निश्चित करण्यासाठी

**वेबसाईट : chrysalislife.org**

**फोन :** +91-80-25452617 किंवा टोल-फ्री (भारतांतर्गत) 1-800-300-00998

**ई-मेल : counselor@chrysalislife.org**

क्रिसलिस कॉउंसलिंग ही ऑल पीपल्स चर्च आणि वर्ल्ड आऊटरीचची सेवा आहे.

# ऑल पीपल्स चर्चसोबत भागिदारी

ऑल पीपल्स चर्च स्थानिक मंडळ्यांच्या रूपात संपूर्ण भारत देशात, विशेषतः उत्तर भारतात सुवार्ता गाजवीत आपल्या सरहद्दीपलीकडे सेवा करीत आहे. त्याचे विशेष ध्येय (अ) पुढाऱ्यास स्थिर करणे, (आ) तरूणांस सेवेसाठी सुसज्ज करणे आणि (इ) ख्रिस्ताच्या मंडळीची वाढ करणे आहे. तरूणांसाठी प्रशिक्षण सम्मेलन, 'ख्रिस्ती पुढाऱ्यासाठी सभांचे' संपूर्ण वर्षभर आयोजन केले जाते. याशिवाय, पुस्तकांच्या कित्येक हजारो प्रतींचे इंग्रजी आणि इतर अनेक भारतीय भाषांत विनामूल्य वितरण केले जाते, त्यामागे हेतू हा आहे की विश्वासणाऱ्यास वचन आणि आत्म्यात वाढ करून द्यावी.

आम्ही आपणास निमंत्रण देतो की एका वेळेचे दान पाठवून किंवा मासिक आर्थिक दान पाठवून आर्थिकरित्या आमच्यासोबत भागिदारी करावी. संपूर्ण राष्ट्रात हे कार्य करता यावे म्हणून जी दानराशी आपण पाठवू शकता, त्यासाठी आम्ही आपले आभारी राहू.

आपण आपल्या देणग्या चेक / बैंक ड्राफ्टच्या द्वारे "ऑल पीपल्स चर्च," बँगलोरच्या नावावर आमच्या कार्यालयाच्या पत्त्यावर पाठवू शकता किंवा खालील माहितीच्या आधारे आमच्या बँक खात्यात टाकू शकता :

**बँक खात्याचे नाव:** All Peoples Church
**बँक खाते क्रमांक:** 50200068829058
**IFSC क्रमांक:** HDFC0004367
**बँक:** HDFC Bank, 7M/308 80 Ft Rd, HRBR Layout, Kalyan Nagar, Bengaluru - 560043, Karnataka

***कृपया लक्षात ठेवा:*** *ऑल पीपल्स चर्च केवळ भारतीय नागरिकांच्या बँकेद्वारे मिळालेली देणगी स्वीकार करू शकते. आपली इच्छा असल्यास, आपली देणगी पाठवीत असतांना, स्पष्टपणे लिहा की आपण एपीसी सेवेच्या कोणत्या क्षेत्रासाठी दान पाठवू इच्छिता. अतिरिक्त माहितीसाठी कृपया या स्थळास भेट द्यावी* **apcwo.org/give.**

त्याचप्रमाणे, आमच्यासाठी व आमच्या सेवाकार्यासाठी शक्य तेव्हा प्रार्थना करणे विसरता कामा नये.

**धन्यवाद आणि परमेश्वर देव आपणास आशीर्वादित करो!**

## DOWNLOAD THE FREE APP!

*Search for*
"All Peoples Church Bangalore"
in the App or Google play stores.

Available on the App Store

ANDROID APP ON Google play




*A daily 5-minute video devotional.*
*A daily Bible reading and prayer guide.*
*5-minute Sermon summary.*
*Toolkit with Scriptures on various topics to build faith and information to share the Gospel.*
*Resources with sermons, sermon notes, TV programs, books, music and more.*

*IF YOU LOVE IT, TELL OTHERS ABOUT IT!*

# ऑल पीपल्स चर्च बायबल कॉलेज

**apcbiblecollege.org**

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज आणि सेवा प्रशिक्षणकेंद्र भारताच्या बँगलोरमध्ये आत्म्याने परिपूर्ण, अभिषिक्त, सक्रिय सेवेत सहभागी प्रशिक्षणआणि सिद्धांताच्या दृष्टीने योग्य व परमेश्वराच्या वचनाच्या बौद्धिक दृष्टीने प्रेरणादायक अभ्यासासह पवित्र आत्म्याच्या अलौकिक सामर्थ्यात विद्यार्थ्यांस सेवेसाठी तयार करते. आम्ही सेवेसाठी संपूर्ण व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर विश्वास ठेवतो. तसेच या प्रशिक्षणात ईश्वरीय चारित्र्य, परमेश्वराच्या वचनाचा गंभीर पाया, आणि चिन्ह, चमत्कार व अद्भुत कृत्ये यावर जोर दिला जातो—सर्वकाही प्रभुच्या निकट सान्निध्यात प्रवाहित होते.

ऑल पीपल्स चर्च बाइबल कॉलेज (एपीसी-बीसी) मध्ये, योग्य शिक्षणाशिवाय, आम्ही प्रत्यक्षपणे देवाचे प्रेम, अभिषेक आणि पवित्र आत्म्याचे सान्ध्यि आणि देवाच्या अलौकिक कार्यावर जोर देतो. अनेक तरूण स्त्रीपुरुषांनी हे प्रशिक्षण घेतले आहे आणि त्यांच्या आयुष्यात देवाचे पाचारण पूर्ण करण्यासाठी त्यांना सेवेत पाठविण्यात आले आहे.

पुढील तीन पदव्या दिल्या आहेत,

- मध्ये एक वर्षांचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (C.Th.)
- मध्ये दोन वर्षांचा डिप्लोमा अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (Dip.Th.)
- मध्ये तीन वर्षांचा स्नातक अभ्यासक्रम थिओलॉजी अँड ख्रिश्चन मिनिस्ट्री (B.Th.)

वर्ग प्रत्येक आठवड्याच्या दिवशी, **सोमवार ते शुक्रवार भारतीय वेळ (UTC+5:30) सकाळी 9:00 ते दुपारी 12** पर्यंत चालविले जातात. आम्ही तीन शिक्षण पर्याय देऊ करतो

**ऑन-कॅम्पस :** कॅम्पसमध्ये वैयक्तिकरित्या वर्गांना उपस्थित रहा
**ऑनलाइन :** ऑनलाइन प्रत्यक्ष व्याख्यानांना उपस्थित रहा
**ई-लर्निंग :** ऑनलाइन पोर्टल **apcbiblecollege.org/elearn** द्वारे स्वतःच्या गतीने शिकणे.

**ऑनलाइन अर्ज,** करण्यासाठी आणि कॉलेज, अभ्यासक्रम, पात्रता निकष, शिकवणी खर्च आणि अर्ज डाउनलोड करण्यासाठी अधिक माहितीकरिता, कृपया या संकेतस्थळास भेट द्या **apcbiblecollege.org.**

जीवनात, सर्व प्रकारच्या गोष्टी मन दुखवू शकतात, अडखळणे आणू शकतात. आपले मन दुखावले किंवा अडखळले, की याचा आमच्या अंतःकरणावर शेवटी अनेकप्रकारे प्रभाव पडतो ज्याची आम्ही कल्पनाही करू शकत नाही. जेव्हा आपण दुखावलेल्या अंतःकरणाने कार्य करतो, तेव्हा आपण बरेचदा अशा गोष्टींबद्दल विचार करतो, अशा गोष्टी बोलतो आणि अतिशय तर्कशून्य आणि विवेकशून्य वर्तन करतो. जेव्हा हे मंडळीच्या जीवनात होते, देवाच्या लोकांत होते, तेव्हा आम्ही काही दुःखद गोष्टी घडतांना पाहतो!

पवित्र शास्त्र अडखळणाविषयी काय म्हणते? जेव्हा आम्ही अडखळतो तेव्हा आम्ही कसा प्रतिसाद दिला पाहिजे? जेव्हा आम्ही अडखळतो तेव्हा मनात येणाऱ्या नकारात्मक भावनांपासून आपण कशी सुटका मिळवितो? परमेश्वराच्या वचनातून हा सोपा, परंतु उद्बोधक अभ्यास या प्रश्नांची उत्तरे देऊ शकतो आणि अडखळणांपासून पूर्णपणे मुक्त असे जीवन जगण्यात आपली मदत करू शकतो.

नेंहमी अडखळणाच्या भावनांच्या वर जगा!

**All Peoples Church & World Outreach**
# 319, 2nd Floor, 7th Main, HRBR Layout,
2nd Block, Kalyan Nagar, Bangalore 560 043
Karnataka, INDIA

Phone: +91-80-25452617
Email: contact@apcwo.org
Website: apcwo.org